# जागर हा जाणिवांचा,
# तुमच्या–माझ्या लेकींचा...

सुप्रिया सुळे

ग्रंथाली वाचक चळवळीचे
रुची
जून २०१२ • मूल्य १० ₹






'अखेर न्याय मिळाला' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी उषा मेहता, नीला सत्यनारायण, महेश कोठारे, डॉ. स्नेहलता देशमुख, श्रीकांत कुलकर्णी, लेखिका ॲड. नीलिमा कानेटकर आणि स्वरूपा ढोलम

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**जून २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक सहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

विश्वनाथनच्या विश्वविक्रमानं भारतवर्षाला आनंद झाला. एक चौरस फुटाच्या पटावरून जगावर राज्य गाजवणाऱ्या या बुद्धिमानाचा गौरव झाला. मात्र जिथे स्पर्धाच नाही त्या मनोरंजक आयपीएल विजेत्या संघाला कोलकात्याच्या मुख्यमंत्री सोन्याच्या साखळ्या घालून, जल्लोषात सामील होतात, की जो विजय राज्यस्तरीय रणजीसारखी स्पर्धा असती तरी समजण्यासारखा होता, इतक्या प्रगल्भ देशाचा विश्वनाथनही एक नागरिक आहे. पांढरी कबुतरं उडवून मैत्री, प्रेमाचा संदेश देणाऱ्या या देशात त्या पांढऱ्या कबुतरासारखी 'स्वच्छ' नेतेमंडळी एकमेकांना 'सॅल्युट' करताना आपण पाहतो. पक्षिनिरीक्षकांच्या मते मात्र कबुतर म्हणजे उडणारा उंदीर! त्याचा उपद्रवच अधिक, हे त्यांचं म्हणणं वास्तवाचं भान आणून देणारं आहे. सब भूमी या कबुतरांची तिथे एक चौरस फुटाच्या साम्राज्याची खरी ममता त्यांना काय! विषय वादग्रस्त असो वा एखाद्याच्या कर्तृत्वाला मानवंदना असो, जनतेचा प्रचंड सहभाग असेल तिथे उपस्थित राहण्याचं व्यवहारचातुर्य त्यांना उत्तम अवगत असतं.

महाराष्ट्रात आजही स्त्री–भ्रूणहत्या होताहेत. मुलींचं प्रमाण घटत आहे. गावखेड्यांत जातपंचायतीचा कानून किती भयंकर प्रकार घडवतो हे 'सत्यमेव जयते'मधून आज देश पाहतोय. समाजातील अभद्र रूढींवर कठोर प्रहार होऊनही, कायदे होऊनही हे घडत आहे. सुप्रिया सुळे यांनी स्त्री–भ्रूणहत्येबाबत समाजाची मानसिकता बदलण्यासाठी 'जागर' मांडलाय. या अंकात त्यांनी आपली भूमिका व अनुभव लिहिला आहे.

'डॉ. डेथ'नं काही रुग्णांच्या मरणाला वाट मोकळी करून दिली. त्यासाठी त्याला कारावास भोगावा लागला. कसा होता हा डॉक्टर ते स्मिता भागवत यांनी, त्याच्या मृत्युदिनानिमित्त लिहिलेल्या लेखात सांगितलं आहे.

श्रीकांत पेटकर यांनी दिलेली चोळा पॉवर स्टेशनची माहिती, डॉ. माधवी मेहेंदळे यांचा विदारक अनुभव, चित्रपटशताब्दीच्या निमित्तानं अरुण पुराणिकांचा लेख असं साहित्य या अंकात आहे.

अनेकांच्या वाचाळ 'वाक्‌स्पर्शां'पेक्षा काही विचारयोग्य वाचल्याचं समाधान मिळेल असा विश्वास वाटतो.


**– कार्यकारी संपादक**

# मुलखावेगळा डॉक्टर!

## स्मिता भागवत

डॉक्टर जॅक केवोर्किअन (Jack Kevorkian) यांनी ३ जून रोजी, मिशिगन प्रांतातील रॉयल ओक येथील ब्युमंट हॉस्पिटलमध्ये देह ठेवला. डेट्रॉइटच्या डॉक्टरने त्यांना लिव्हर कॅन्सर झाल्याचे निदान कधीच केले होते. पण १८ मे रोजी ते हॉस्पिटलात दाखल झाले, ते मूत्रपिंड आणि हृदयरोगावर उपचारासाठी! उपचारास ते बरा प्रतिसाद देत असूनही फुप्फुसाच्या रक्तवाहिनीत रक्ताची गुठळी अडकून प्राणोत्क्रमण झाले, अशी बातमी दूरदर्शन नि वृत्तपत्रांत जाहीर झाली. मृत्यू संशयास्पद! त्यांचे वादग्रस्त कार्य ठाऊक असणाऱ्यांची स्मृतिमंजुषा या बातमीने चाळवली. त्यात माझाही समावेश!

जॅक केवोर्किअन हा जीवनदाता! पॅथॉलॉजिस्ट डॉक्टर! तरी त्यांनी असह्य वेदनेने हैराण झालेल्या १३२ रोग्यांना मरणप्राय वेदनेतून सोडवले – मरण दिले! त्यांच्या ठाम विचारसरणीची किंमत त्यांनी आठ वर्षे कारावास सोसून चुकवली. कारावास चुकवण्यासाठी तोंडदेखली क्षमायाचना करण्याचा पळपुटेपणा त्यांनी केला नाही. सामान्य लोक त्यांना 'डॉक्टर डेथ' नावाने ओळखत. क्रूरकर्मा, चांडाळ, जल्लाद... अशी विशेषणे बहाल करत. सामान्य बुद्धिप्रामाण्यवादी प्रजा मात्र त्यांना बुद्धिमान डॉक्टर, तर्कतीर्थ माणूस, देवदूत, फरिश्ता म्हणत नावाजत असे. त्यांनी मुक्त केलेल्या काही त्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांचा यात समावेश आहे. उरलेले नातेवाईक समाज टीका करील या भयाने गप्प असले तरी त्यांना



स्वजनाच्या अतीव वेदना संपणे आवडले आहे, असे डॉक्टर केवोर्किअन यांचे मत!

ही परस्परविरोधी विशेषणे मला ठाऊक होती. म्हणून अपार कुतूहलापोटी मी फोनवर त्यांची मुलाखत घेतली. मला शक्य असलेल्या प्रत्येक भारतीय भाषेत मी ती लिहावी, असे ते आवर्जून म्हणाले. कारण त्यांच्या लेखी हे काम एक मिशन होते. ते पटले, तरी तेव्हा मला अजिबात बरे नव्हते. मग साचल्या कामाळची झुंबड उडाली. कधी उगीच चालढकल झाली. ही मुलाखत मी कोणत्याही भाषेत लिहिली नाही. त्यांनी देह ठेवल्याच्या बातमीने मनात अपराधी भाव निर्माण केला. मधमाशीच्या पोळ्यास खडा लागल्यागत आठवणी उसळल्या. त्यात वाचनात नि दूरदर्शनवर बघण्यात आलेल्या माहितीची भर पडत राहिली.

महिने उलटले तरी या संदर्भात उलट-सुलट चर्चा चालू राहिल्या. त्यांचे कार्य वादग्रस्त! त्यास साजेसे मरण! काही जाणकारांनी मृत्यू रक्ताची गुठळी नव्हे हवेचा बुडबुडा अडकल्याने (Pulmonary embolism) झाला, असा दावा केला. बुडबुडा रक्तवाहिनीत मुद्दाम सोडला असाही! घटना अनेक वर्षे जुनी झाली तरी त्याबाबत ठाम निर्णय होणार नाही. कारण मृत्यू घडला की घडवला, हे जाणणारे डॉक्टर आता नाहीत. त्यांनी बुडबुडा रक्तवाहिनीत कसा सोडला हे कुणी छाती ठोकून सांगितले तरी तो तर्कच, पुरावा नव्हे! या चर्चेने त्यांच्या देहावसानाच्या बातमीने उठवलेले आठवणींचे मोहोळ शमू दिले नाही. त्यांचे कार्य व व्यामिश्र व्यक्तिमत्त्वाचे मला झालेले दर्शन लिहिल्याविना हे झाड मला सोडणार नाही, अशी खात्री पटली.

वस्तुत: ही out of sight is out of mind अशी बाब नव्हती. विविध प्रसंगी त्यांचे स्मरण अटळ ठरे. कधी त्यांचा 'पराक्रम' कारण ठरे तर कधी सुखांत वा 'गुजारीश'– सारखा चित्रपट! मरणयातना असह्य झाल्याने त्यातून सोडवण्यासाठी देवास साकडे घालणाऱ्या रुग्णाचा आक्रोश ऐकताना ते आठवत! बरे होणे अशक्य असलेल्या नि देव सोडवत नसलेल्या व्याधीग्रस्त रुग्णांना सोडवण्याचा त्यांनी वसा घेतला होता. चाकोरीविरुद्ध जगणाऱ्यास संघर्ष पेलावा लागतो. त्यांनी तर गरिबी व अवमानच नव्हे तर कारावास सोसला. तरी घेतला वसा टाकला नाही. अशी व्यक्ती विरळाच!

माझ्या मनात अपार कुतूहल! ज्या

प्रश्नाचा चावून चोथा केल्यावरही समाज निर्णय घेऊ शकत नाही, त्यात स्वत:स योग्य वाटणारा निर्णय अमलात आणण्याचे त्यांचे धाडस! मागेल त्या प्रत्येकाला ते मरण्यास मदत करतात, की त्यांची खास आचारप्रणाली आहे, हा प्रश्न मला अस्वस्थ करी. म्हणून मी मुलाखत मागितली. सामान्य व्यक्तीस धुडकावून महान ठरण्याची रीत असलेल्या ढोंगी देशात त्यांचे/माझे वास्तव्य नसल्याने ते जमले. संपर्क साधण्यास दैहिक समस्येचे भांडवल करून, मरण्यास मदत मागितली. त्यांनी सांगोपांग चर्चा केली. ही शारीरिक स्थिती मरण मागण्यास योग्य नाही, हे स्पष्ट सांगून त्यांनी उपचार घेण्याची भलावण केली. त्यांचा स्पष्ट अभिगम कळावा यासाठी मी गनिमीकाव्याची मदत घेतल्याचे सांगितले. मरायचे नसून! मग झाली स्मरणमंजुषेत जपण्याजोगी भन्नाट मुलाखत!

त्यांचे जीवनकार्य वादग्रस्त! कायद्या-तील त्रुटी नि मरणेच्छा यातील अथक लढा! शब्दांच्या पलीकडे जाऊन त्यांनी सहनशक्ती, इतरांकडून ठेवली जाणारी सहनशक्तीची अवास्तव अपेक्षा, इच्छा, गुन्हा वगैरेंचा नेटाने शोध घेतला. बहुसंख्य शिक्षितांचा असा शोध शब्दबंबाळ ठरतो. परिणामशून्य! निष्क्रिय! त्यांनी शिक्षितांच्या निष्क्रियतेचा छेद उडवला. कळते पण वळत नाही असा नव्हे; तर कळते तसे वळते, असा! ते सांगताना त्यांनी निवडक घटना सविस्तर सांगितल्या.

मरण्यास मदत केलेले त्यांचे बहुतेक रुग्ण पन्नाशीचे! त्यांच्या मते, मरणप्राय स्थिती कधी नैसर्गिक असते तर कधी विकृतीचे फलित! डॉक्टर डेथ नावाने बदनाम असलेला जॅक (मूळ नाव जॅकोब) कमालीचा हळवा! मनात माणुसकीचा झरा. मरण्यास मदत मागून मी संवाद सुरू केला; म्हणून या अवलियाने मरण्यास मदत नाकारल्याचे किस्से आधी ऐकवले.

बारबाला. विकृतीची शिकार. स्वार्थी दलालाने तिचे सौंदर्य हेरून तिच्या गरीब पित्यास आमिष दाखवले. गरिबास मोठी वाटलेली रक्कम वास्तवात तिच्या कमाईचा अंश! तो लोणी ओरपून तिला फुळकवणी पाणी देई. लैंगिक शोषण असे. तिला गुप्तरोग (gonorrhoea) झाला. सुरुवात पायात कळा येण्याने झाली. पेनकिलर घेऊन ती नाचत राहिली. पुढे वेदना वाढल्या. तपासणीत स्थिती कळली. पाय कापण्याची वेळ आली. नाच नाही तर आवक नाही! दलालाचा खर्च करण्यास नकार! चर्चेत वेळ वाया गेल्याने परिस्थिती चिघळली. पाय कापल्यावर तिला कृत्रिम पाय लावूनही चालता येऊ नये अशी! डॉक्टरांनी मरणाची वाट बघण्याचा सल्ला दिला. तिला प्रतीक्षा व परावलंबी जिणे नकोसे वाटले. गरीब घरात निरुपयोगी व्यक्ती बोजा ठरली. तिने जॅकशी संपर्क साधला. मरण मागताना तिने दगडास पाझर फुटावा अशी परिस्थिती सांगितली. जॅक हळवा!


डॉक्टर जॅक केवोर्किअन पॅथॉलॉजिस्ट! सर्जन नसूनही त्यांनी सर्जनांनी नाकारलेली सर्जरी विनामूल्य करण्याची तयारी दर्शवली. ती चालू शकेल, स्वावलंबी जीवन जगू शकेल, अशी खात्री देऊन त्यांनी हे काम केले. जे साहस जीवन देण्याची शपथ घेतलेले डॉक्टर करू शकले नाहीत ते डॉक्टर डेथने लीलया पार पाडले.

दुसरा किस्सा, हात कापायची वेळ आलेल्या सुंदरीचा! पित्याचा रेसचे घोडे तयार करण्याचा व्यवसाय! मुलीस वेगाचे आकर्षण! अपघात घडला नि बराच वेळ मदत मिळाली नाही. डावा दंड गाडीखाली चिरडत राहिला. जगायचे तर हाताचा मोह सोडायला हवा होता. दु:खावेगात ती त्यापेक्षा मरण बरे असे म्हणाली. पित्यास रेस हरलेल्या घोड्यास गोळी मारण्याची सवय! त्याने ती लेकीची अंतिम इच्छा ठरवून डॉक्टर डेथशी संपर्क साधला. बापाची लगबग पाहून लेकीस नैराश्य आले. तिला वाटले होते, बाप विरोध करील. तू लाडकी! आमचे तुझ्यावर प्रेम; तुझ्या हातावर नव्हे; असे म्हणेल. बाप मारण्यास उतावीळ झालेला पाहून तिची जीवनेच्छा हरपली. पण जॅक नावाच्या माणसाने भकास शून्यावकाश ओलांडून अलगद वैफल्य टिपले.

या सहृदय माणसाने हात वाचवण्याचा जो मार्ग सुचवला, त्यात हाड सडून ती मरण्याचे भय! ही जोखीम घ्यायला ऑर्थोपेडिक सर्जन तयार नव्हते. सर्जन नसून सल्ला देणाऱ्यास ते उपहासाने थिल्लर अज्ञानी डॉक्टर डेथ म्हणाले. एम.बी.बी.एस.वेळी सारे विषय शिकावे लागतात, उत्तम स्मरणशक्तीच्या प्रामाणिक डॉक्टरला विस्मरण होत नाही; असे जॅक यांनी सांगितले. स्वर-शब्दांत आत्मविश्वासाचा टणत्कार! तरुणीच्या पित्यास तो विलक्षण भावला. लेकीवर त्याचे प्रेम होते. तो तिला आनंदाने मारत नव्हता. म्हणून मारण्यास आणलेल्या व्यक्तीस त्याने लेकीस वाचवण्याचे काम सोपले. मारणारा काय वाचवणार, अशी हेटाळणी करणाऱ्यांना त्याने भीक घातली नाही.

पुढे डॉक्टर डेथची स्मरणशक्ती नि कौशल्य पाहून साऱ्यांनी तोंडात बोट घातले. त्या तरुणीने जॅक यांना प्रतिपरमेश्वर म्हटले. हुरळून न जाता डॉक्टर डेथने 'ना मैं भगवान हूँ, ना मैं शैतान हूँ', असा पवित्रा घेत स्वत:स संवेदनशील, विचारशील माणूस म्हटले. हे काम सुरम्य कृतींची साखळीच!

डॉक्टर डेथने प्रथम दंडास उभा छेद दिला. खांद्यात उखळीचा सांधा तयार करणारा भाग व कोपराचे हाड सुस्थितीत होते. योग्य काळजी घेऊन त्यांनी हाडाचे तुकडे बाहेर काढले. भुगा झालेले सूक्ष्म कण सावधपणे दूर केले. जखम साफ करून त्वचेस टाके घातले. जखम न पिकता भरून आल्याविना अस्थिरोपण होणार नव्हते. जखमेत हाडाचे कण शिल्लक असण्याची व ते सडण्याची शक्यता! सारे पार पडले की अस्थिरोपण! ते सोपे नव्हतेच. अस्थिरोपण करताना आधी त्यांनी दंडाचे हाड; कोपर तयार करते ती दोन टोके निगुतीने साफ केली. मग मदार गुडघ्याखालील मोठ्या हाडावर (Fibula) होती. या जिवंत हाडाचा योग्य मापाचा तुकडा कापून त्यांनी दंडाचे हाड दूर केलेल्या पोकळीत रोपला. शल्यचिकित्सेत वापरतात त्या छोट्या नाजूक खिळ्यांनी (dowels-a) ती हाडे एकमेकांशी घट्ट




**गेल्या तीन पिढ्यांचा संदर्भ असलेली, आंतरराष्ट्रीय राजकीय-सामाजिक पटावर उलगडणारी उत्कंठावर्धक कादंबरी**

**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

सत्तरच्या दशकात भारतीय ब्रेनड्रेनला वेग आला. युरोप, अमेरिकेच्या अटकेपार, भारतीयांनी झेंडे रोवले. भारत हे राष्ट्र म्हणून टिकूच शकणार नाही, अशी कावकाव करणाऱ्यांच्या नाकावर टिच्चून भारतानं बाळसं धरलं. मागासलेला, विकसनशील, अशा पायऱ्या चढत, आज भारत महासत्तेची स्वप्न पाहत आहे. धडपडत, तटस्थतेच्या तारेवरची कसरत चालूच आहे. इतर जगानं, महासत्तांनी भारताकडे विस्मयानं पाहिलं, असूयेनं पाहिलं. त्यामागे अस्पष्ट भीतीही होती.

अनेक शिल्पकारांनी स्वातंत्र्याचा पाया रचला. अनेक महान व्यक्तिमत्त्वांचे दीपस्तंभ आठवतात. आजकाल दीपस्तंभांची उंची खुरटत चालल्यासारखं वाटतं. गांधी या आडनावालाच शाप असावा. महात्माजी, इंदिराजी आणि राजीव मारले गेले. सुभाषचंद्र, लालबहादूर आणि दीनदयाळ यांचे संशस्यास्पद मृत्यू झाले. बांगलादेशचे मुजिब–उर–रहमान, नेपाळचे दिपेंद्रराजे, पाकिस्तानचे झिया उल हक, अशी शेजारच्या देशांतील अनेक मातब्बर व्यक्तिमत्त्वं हरपली. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि सत्ताकरणाची गुंतागुंताची समीकरणं अनाकलनीय असली, तरी भयप्रद आहेत. एक अस्वस्थ खळबळ आहे, सारं काही हरवत चालल्याची भीती वाटते. जगभर उद्रेकाचे पडघम वाजायला लागले आहेत. एकीकडे क्रयशक्तीची भरमसाठ वाढ आहे, तर दुसरीकडे मंदीचा भस्मासूर वाकुल्या दाखवतो आहे. वादळात सापडलेल्या गलबताला दिशाहीनतेचं सावट ग्रासून टाकत आहे.

१९२४ साली रत्नागिरीजवळच्या छोट्याशा गावात जन्माला आलेले विश्वनाथ मोरेश्वर हे पहिल्या पिढीतले. त्यांची दोन मुलं. मोठा रघुनाथ बँकेत नोकरीला, तर धाकटा धनंजय सिक्युरिटी सॉफ्टवेअर आणि एनक्रिप्शन क्षेत्रातील तज्ज्ञ. रघुनाथाचा एकुलता एक मुलगा सौभद्र आणि त्याची अमेरिकन मैत्रीण ज्युलिया ही तिसरी पिढी. ८५ वर्षांचा कालखंड, अमेरिका, ब्रिटन, दिल्ली, डोंबिवली असा विस्तृत रंगमंच. एका उत्कंठापूर्ण जिगसॉचे तुकडे जुळवत चित्र उभं करणारी ही कहाणी. सामान्य माणसांच्या आयुष्यात असामान्य घटना घडल्या की नाट्य जन्माला येतं. हे नाट्य उलगडून दाखवणारी ही कादंबरी.

सांधली. सावध कौशल्य गरजेचे होते. कोणत्याही टप्प्यावर गडबड होणे मरणास निमंत्रण ठरणार होते. वास्तविक त्यांचे आगमन तातडीने मरण घडवण्यासाठीचे! तरी धीर आणि चिकाटीने त्यांनी तिला जगवले. प्रत्येक ऑपरेशनसाठी तीन-तीन तास खर्चून मरण मागणारीस जीवन दिले. हजार-बाराशे मरणेच्छुकांनी त्यांची मदत मागितली. म्हणजे मदत नाकारल्याचे कित्येक किस्से त्यांच्या पोतडीत असणार.

इच्छामरण, दयामरण- euthanasia, mercy killing, assisted death वगैरे कायद्याने मान्य करावे का, या प्रश्नाचे घोंगडे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत, कॅनडा, न्यूझीलंड, स्वित्झर्लंड, नेदरलँड, मेक्सिको, युरोप या देशांत अनेक वर्षे भिजत पडले आहे. जगातील इतर देश या प्रश्नाचे अस्तित्वच नाकारतात. अशावेळी डॉक्टर जॅक केवोर्किअन यांनी, वेदना सहन करून थकलेल्या रुग्णांच्या इच्छेस मान दिला. मरण्यास मदत केली. मदत करण्याची घाई न करता! मरण टाळणे योग्य वाटल्यास बरे होण्याचा सल्ला दिला. तरी जाणकारांनी, काही रुग्णांच्या संदर्भात आशा बाळगण्यास जागा होती असा दावा केला. इच्छामरण, दयामरण वगैरे संदर्भात - जागतिक चर्चेत ते आपली विचारप्रणाली का योग्य आहे, हे ठसवत जनजागृतीचा प्रयत्न करत. भारतात जितक्या भाषांत ते विचार पोचवणे जमेल, तितक्या भाषांत मी पोचवावे असे सांगणे, हा त्या प्रयत्नांचा भाग! मी वयाने त्यांच्यापेक्षा लहान! म्हणून हा प्रयत्न मी पुढेही चालू ठेवावा ते असे म्हणाले. मी सुपात नि ते जात्यात असल्याचे नि मरण वयाचे ज्येष्ठत्व विचारात घेण्यास बांधील नाही, असे मी म्हणाले तरी!

रोग्यांच्या असह्य वेदना पाहून डॉक्टर जॅक यांचे काळीज पिळवटून निघे. मनात वैफल्य निर्माण होई. रोगी विश्वासाने डॉक्टरकडे बघतो. त्या विश्वासास अपात्र ठरल्यासारखे त्यांना वाटे. रोग बरा होणे शक्य नसलेल्यास चमत्काराच्या आशेपायी कृत्रिम उपायांनी जगवणे, करुणा आणि क्रौर्य यातील फरक नाकारणे - रोग्यावर वेदना लादणे आहे; असे त्यांना वाटे. गेल्या शतकाच्या ८व्या दशकात त्यांनी सुखद मरण या विषयावर खूप वाचन, मनन व लेखन केले. १९८३ साली सरधोपट व्यवसाय सोडून त्यांनी स्वत:स मरणसमुपदेशक - डेथ कौन्सेलर ही ओळख दिली. म्हणून लोक त्यांना डॉक्टर डेथ म्हणू लागले.

जीवनास कंटाळलेल्या, व्याधीग्रस्त, तार्किक विचारांच्या लोकांना ते मुक्तिदाता - फरिश्ता वाटत. बरेच बुद्धिप्रामाण्यवादी अपार धन आणि वैद्यकशास्त्र राबवून व्यथित जीवन लांबवणे अर्थहीन आहे; वयस्क व्यक्तीने शांतपणे मरण स्वीकारणे योग्य आहे, असे मानत. अर्थहीन जगण्यापेक्षा मरणास निमंत्रण योग्य ठरवत. हल्ली आयुर्मर्यादा वाढली नसून अर्थहीन जगवणे वाढले आहे, असे डॉक्टर डेथ आग्रही स्वरात म्हणत. यावर कुणी, तुम्ही असे का मरत नाही, हा तिरकस प्रश्न विचारी. ते 'योग्यवेळी' या शांत उत्तराने अशांची बोळवण करत.

स्वत:च्या विचारांच्या समर्थनार्थ त्यांनी समाजास कळीचे प्रश्न विचारले. पूर्वी बाळंतीण अडली की बाळासकट मरत असे. आता सीझर वापरून बाळ-बाळंतीण वाचवतात. ईश्वर, निसर्ग वा अनामिक शक्तीची चूक मानवी प्रयत्न सुधरवतात. जन्मावेळी अडसर दूर करणे गैर नसले तर मरणावेळी प्रयत्नपूर्वक अडसर दूर करणे गैर कसे? (If we can aid people coming into the world, why can't we aid them in exiting the world?)

रोग निसर्गनिर्मित. रोगास बळी पडणे टाळून, मानवाने वैद्यकशास्त्र निर्माण करून निसर्गावर कुरघोडी का केली? वैद्यकशास्त्र आणि वेदनाशामक निर्माण करणे चूक नसेल तर त्रस्त रुग्णाची मरणाची मागणी चुकीची कशी? ज्या वेदना शमवू शकणारे औषध निर्माण करणे जमत नसेल, त्या वेदना - जीवन नष्ट करण्याची वैज्ञानिक रीत शोधणे व अमलात आणणे गैर का? क्षणिक नैराश्यास वश होऊन आत्महत्या करणे आणि असह्य वेदना संपवणाऱ्या मरणाचा मार्ग शोधणे यात फरक आहे. यास वेदनाहत्या का म्हणू नये? समाजास त्यांचा प्रत्येक मुद्दा पटत होता. डॉक्टर तसेच न्यायनिपुण एकही मुद्दा खोडून काढणारा समर्थ तर्क सादर करू शकत नसत. तरी जीवन संपवणे वा संपवण्यास मदत करणे, हेतुपुरस्सर वध ठरतो; असा त्यांचा विरोध असे. तरी म्हणजे ठीक काय, ते सांगणे कुणास जमत नसे.

योग्य वाटणाऱ्या तार्किक मताचा आदर करण्यासाठी त्यांनी समाजात अवास्तव आणि अतार्किक ठरणारे पाउल उचलले. त्यासाठी व्यक्तिगत जीवनाचा होम केला. अपार नुकसान सोसले. असाध्य रोग आणि असह्य वेदनांमुळे नरकयातना भोगणे हेच जगणे असलेल्या रुग्णांना असे वेदनामुक्त करण्याच्या प्रयत्नाच्या मुळाशी माणुसकीचा झरा आणि कणव असूनही रुढीचुस्त समाज आणि न्यायप्रणालीने यास हेतुपूर्ण मनुष्यवध ठरवले.

आपण योग्य तेच करत आहोत, या मतावर ते ठाम राहिले. सतत आर्थिक चणचण सोसावी लागली तरी ते बधले नाही. उपचार व वेदनाशामकाचा खर्च करून कंगाल झालेल्या मरणइच्छुकास स्वस्तात मरता यावे, यासाठी त्यांनी अवघ्या तीस डॉलरचे साधन तयार केले. याचा संबंध कनवाळू वृत्तीशी जोडून ते त्यास मर्सिट्रोन (Mercitron) म्हणत. समाज मात्र तोंड मुरडून त्यास डॉक्टर डेथचे आत्मघातकीयंत्र म्हणे. प्रसंगी ते मरण सोपे करणारा कार्बनमोनोक्साइडला जोडलेला मास्क वापरत. मरणाऱ्यास नगण्य जंतू न समजता ते निवडीचा हक्क देत. दोन्ही साधने रुग्णास वेगाने मुक्त करत.

मर्सिट्रोन साधनात विशिष्ट रसायन भरलेल्या बाटलीचा समावेश होता. बाटली देहास जोडून तीत इंजेक्शनच्या मदतीने खास प्रकारचे रसायन सोडायचे असे. हे काम रुग्ण स्वत: करत असे. ही रसायने कोणती ते त्यांनी कुणाला सांगितले नाही. जगणे नको झालेल्यास गुपित जाणण्यापेक्षा मरणप्रक्रियेस असाधारण वेग प्राप्त होणे, वेगाने देहातील चैतन्य नष्ट होणे, मृत्यू घडवल्याचे सिद्ध

करणाऱ्या खुणा पटकन नाहीशा होणे, महत्त्वाचे वाटे. ते lethal cocktail of chemicals – अर्सेनिक, सायनाइड वा तत्सम मारक रसायनांचे मिश्रण असावे, असा जाणकारांचा तर्क होता. डॉक्टर डेथ यांनी आरोपीच्या पिंजऱ्यातही गुपित जाहीर केले नाही.

वेदनांनी त्रासलेल्यास मदत करण्यास ते तत्पर असत. समाजास ही तत्परता म्हणजे मारण्याची उत्सुकता – विकृती वाटे. म्हणून समाजाने त्यास तीव्र विरोध केला. परिणामी त्यांना अपार आर्थिक ओढगस्त सोसावी लागली. त्यांची वॅन (Volkswagen) अत्यंत जुनी नि गंजलेली होती. हॉर्न बाद करता तिचे सारे भाग वाजत. त्यांना हेच काम असावे असे समजणारे लोक त्यांची वॅन दिसली की मृत्यूच्या बातमीची प्रतीक्षा करत. वास्तविक हाती घेतलेल्या कार्याचे महत्त्व समाजास पटवण्यास परिव्राजकागत ते सतत फिरत. विविध वैद्यकीय संस्था व कायदेपंडितांना भेटत. कार्याच्या समर्थनार्थ कळकळीने विचार मांडत. बुद्धिप्रामाण्यवादी लोकांना, कायद्यात बदल व्हावा, असे वाटे. म्हणून डॉक्टर डेथ यांची विचारप्रणाली नीट जाणून घेण्यास ते त्यांना बोलावत. समाजाने या कार्याचे महत्त्व समजून घ्यावे, मारक रोगांची शिकार बनलेल्या रुग्णांच्या संदर्भात वांझ नव्हे तर क्रियाशील सहानुभूती निर्माण व्हावी, यासाठी डॉक्टर केवोर्किअन रक्ताचे पाणी करत. त्यास समंजस लोकांचा पाठिंबा असे. जीवनदानास दया ठरवण्याची चाकोरी भेदून समाजाने अशा रुग्णांकडे वेगळ्या नजरेने पाहावे, असे मत ते जाहीरपणे मांडत. रुग्णाचे हाल न बघवणाऱ्या सहृदय नातेवाईकांना त्यांचा युक्तिवाद पटे. पण इस्टेटीच्या लोभाने असे पाऊल उचलण्यास रोग्यास भरीस घातले, या आरोपाचे त्यांना भय वाटे. खुद्द डॉक्टर जॅक यांना, वेदनारहित मरणास कायद्याने मान्यता नाकारण्यापाठी सुक्या संगे ओले जळू नये, ही सदिच्छा आहे, हे कळत असे. मोजक्या शक्यतांपायी सर्व त्रस्त रुग्णांना खितपत पडावे लागणे त्यांना अयोग्य वाटे. उत्तम न्यायसंस्थेकडे रोगी मरणास उद्युक्त झाला की केला, हे कसून तपासण्याची व्यवस्था असायला हवी, असे ते म्हणत. मी रोगी बरा होणार नसल्याची खात्री पटल्याविना मरण्यास मदत करत नाही, असे सांगून विचारत, हे माझ्यासारखा एकांडा शिलेदार कफल्लक असून करू शकतो; ते योग्य संस्थेस काम सोपल्यास का नीट होणार नाही?

कायद्याने हे काम होण्याची वाट न बघता ते स्वत:स योग्य वाटेल ते करत. कित्येक संशयास्पद मृत्यू घडवल्याचे त्यांच्यावर आरोप झाले. रुग्ण स्वत: कारवाई करत असल्याने ते कायद्याच्या कचाट्यात सापडत नसत. पण एकदा त्यांच्या करुणेने मर्यादा ओलांडली. एका स्त्रीस हे स्वत: हाताळण्याचा धीर होईना. तिने कळवळून कृतीतही डॉक्टरांची मदत मागितली. डॉक्टर डेथच्या देहात वसलेल्या जॅक नावाच्या माणसाच्या काळजास पाझर फुटला. आणि...

कायदा मागावर होताच. ४ जून १९९० रोजी मर्सिट्रोनच्या मदतीने मृत्यू पावलेली ५४ वर्षांची जेनेट अडकिन त्या कुप्रसिद्ध वॅनमध्ये सापडली. काहींच्या मते, जेनेटला स्मृतिभ्रंश – अल्झायमर असल्याने डॉक्टर डेथने तिचा प्रयोगासाठी उपयोग केला. म्हणून त्यांच्यावर हेतुपूर्ण वधाचा (First degree murder) दावा झाला. ते निर्दोष सुटलेही. म्हातारी मेल्याचे दु:ख नसते, पण काळ सोकावतो असे म्हणतात. तसे घडले. १९९४-१९९९ याकाळात विविध रुग्णांच्या संदर्भात असे वारंवार आरोप झाले. सर्व लढतीत त्यांना मित्र व कायदेशीर सल्लागार जॉफरी फायगर यांची मदत होती. त्यांना १० ते २५ वर्षे सजा होऊ शकत होती पण ते स्वत:स निर्दोष सिद्ध करू शकले. तरी डॉक्टर डेथ यांचा वैद्यकीय व्यवसाय करण्याचा परवाना (लायसन्स) रद्द झालाच.

१९९८ च्या सप्टेंबरच्या १७ तारखेस वेगळे घडले. मारक रोग Lou Gehrig disease ची शिकार असलेल्या थॉमस यौक (Thomas Youk) या ५२ वर्षांच्या रुग्णाची भेट घडली. १९९९च्या सुरुवातीस त्याला मिशिगन राज्यात मारक रसायनाच्या साहाय्याने मरण्यात मदत केल्याचा आरोप डॉक्टर डेथवर झाला. सुनावणी सुरू झाली. त्यांनी नाही आरोप शिरोधार्य ठरवला की क्षमायाचना! बुद्धिमान डॉक्टरने आपण गुन्हेगार नाही, हे पटवताना वकिलाच्या मदतीने आगळा पवित्रा घेतला.

१९९४ साली अत्यंत कमी बहुमताने (५१.३%) का असेना, ओरेगॉन राज्यात 'डेथ विथ डिग्निटी' कायदा झाला होता. रुग्णास डॉक्टरने मरण्यास मदत करण्यास (physician-assisted suicide or voluntary euthanasia) मान्यता दिली तरी त्यात कायदेशीर गुंते असल्याने, डॉक्टर त्या वाटेस जात नसत. जॉफरी फायगर यांनी या कायद्याचा उल्लेख केला. सुनावणी मिशिगनमध्ये होत असली तरी दोन्ही राज्ये अमेरिकेत आहेत; कोणत्याही राज्यात झालेले उत्तम कायदे लवकरच अमेरिकेत इतरत्र होत असण्याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. डॉक्टर जॅक केवोर्किअन गुन्हेगार नाहीत, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण आरोपाचे पूर्णतया खंडन करण्यात त्यांना यश मिळाले नाही. सेकंड डिग्री मर्डरचे आरोपी डॉक्टर केवोर्किअन यांची २६ मार्च १९९९ रोजी कोल्ड वॉटर मिशिगन तुरुंगात रवानगी झाली.

पत्रकारांनी २००५च्या सप्टेंबरमध्ये पॅरोलवर सुटण्याची संधी मिळाली तर काय कराल, असे डॉक्टर केवोर्किअन यांना विचारले. पॅरोल स्वीकारल्यास मरणोच्छुक रुग्णास मदत करता येणार नाही; कायदा लवकर व्हावा यासाठी प्रयत्नच जमेल, म्हणून आपण पॅरोल घेणार नाही, असे ते म्हणाले. पुढे, २२ डिसेंबरला त्यांना खरोखर पॅरोलची संधी मिळाली. त्यांनी ती नाकारली. २००६ साली ते हिपेटॅटिस-सीमुळे आजारी झाले. त्यांच्या हाती केवळ वर्षाचा काळ उरला आहे, असे डॉक्टरांना वाटले. म्हणून पॅरोल बोर्डाने त्यांना मुक्तीची संधी दिली. त्यांनी ती परत नाकारली. आठ वर्षे, अडीच महिने कारागृहात काढल्यावर २००७ साली उत्तम वागणुकीस दाद देऊन त्यांना सन्मानाने मुक्त

करण्यात आले. मरण्यास मदत करू नये, ही सूचना होतीच.

कारागृहातून बाहेर पडल्यावर ते परत जोमाने कामास भिडले. असाध्य रोगाची शिकार ठरलेल्या वेदनापीडित रुग्णास जीवन संपवण्याचा आणि डॉक्टरांना त्यात मदत करण्याचा हक्क असावा, हा विचार महत्तम लोकांपर्यंत पोचवण्याचा त्यांनी प्रयत्न आरंभला. आकाशवाणी, दूरदर्शनवर मुलाखती, नियतकालिकांत लेखन, विश्व-विद्यालयात भाषणसत्र...विविध मार्गांनी वैचारिक जागरणाची त्यांनी राळ उडवली. आपल्या हातात फार वेळ उरला नसल्याने आपण वेगाने काम केले पाहिजे असा त्यांच्या मनात आग्रह दाटला. भाषणानंतर ते फ्लोअर डिस्कशनचा (प्रश्नोत्तरे) आग्रह धरत. दूरदर्शन मुलाखतीत एकदा त्यांना, तुम्ही स्वत:स परमेश्वर समजून त्याच्या कामात ढवळाढवळ करता का, असा तिरकस प्रश्न विचारला. स्वर किंचितही चढू न देता ते उत्तरले, 'अर्थात! कुणी कोणत्याही प्रकारे अनैसर्गिक कृती करतो, ती निसर्गावर मात करण्याची इच्छा असते. म्हणून त्यास ढवळाढवळ न समजता, परमेश्वराचे कार्य समजले पाहिजे.' २०१० साली संजय गुप्ताने घेतलेल्या मुलाखतीत त्यांनी खडसावून विचारले, 'वस्तुत: वेदनेने त्रस्त झालेला रुग्ण जगला की मेला, याचे समाजास सोयरसुतक असते कुठे? मग विरोध कशासाठी? केवळ ओरेगॉन नव्हे तर वॉशिंगटन व मोन्टाना राज्यांतही या कार्यास कायद्याने मान्यता दिली आहे. मग इतरत्र इतकी दिरंगाई करणे योग्य आहे?'

बुद्धिप्रामाण्यवादी विचारकांनी त्यांच्या कार्यास मानवंदना देणारा माहितीपट आणि चित्रपट निर्माण केला. २९ ऑगस्ट २००९ रोजी ते एम्मी या विश्वविख्यात पारितोषिकाने सन्मानित झाले. You don't know jack चित्रपटास एम्मी पुरस्कार मिळाला. हेतुपूर्ण मनुष्यवध सिद्ध झालेल्या नि त्यासाठी कारावास सोसणाऱ्या महानुभावास हा सन्मान मिळण्याची ही पहिली घटना! बहुतेक शेवटचीही! त्यावेळी डॉक्टर केवोर्किअन यांना रेड कार्पेटचे भाग्य लाभले. अशक्यप्राय सोहळा त्यांनी याची डोळा याची देही अनुभवला. तरी...

वयोमानाप्रमाणे उपटणाऱ्या प्रकृतीच्या समस्यांकडे काणाडोळा करून, ते अविरत काम करत राहिले. हिपेटॅटिस-सीस डावलल्यामुळे लिवर कॅन्सरची समस्या उपटली. त्यात न्यूमोनियाची भर पडली. १८ मे रोजी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. कृत्रिम उपायाने जगवू नका असे तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले. ३ जूनला मृत्यू झाला. वेदनारहित! मनात शंकेची पाल चुकचुकावी असा! शंका खरी असो वा पूर्वग्रहप्रेरित! डॉक्टर जॅक केवोर्किअन नावाचे बहुचर्चित बहुआयामी व्यक्तिमत्त्व ३ जून २०११ रोजी काळाच्या उदरात गडप झाले, हे निर्विवाद!

डॉक्टर जॅक केवोर्किअन यांचे कायदेशीर सल्लागार जॉफरी फायगर म्हणतात, जॅक अगदी वेगळा होता. तीव्र बुद्धी, आत्मविश्वास, संतुलित विचारप्रणाली आणि मनास पटेल ते करण्याचा निर्धार असलेला असा माणूस मी जीवनात दुसरा बघितला नाही. सामान्य माणसास अशक्यप्राय वाटणाऱ्या अनेक बाबी तो एकाच वेळी सहज हाताळत असे.

खरोखर, असाध्य रोगाने त्रस्त रुग्णास वेदनारहित मरण प्रदान करण्याच्या उद्देशाने वैद्यकीय व्यवसाय सोडणाऱ्या डॉक्टर जॅक केवोर्किअन या माणसाचे व्यक्तिमत्त्व व्यामिश्र होते. ते भावनाप्रधान आणि कलाप्रिय होते. नाणावलेले चित्रकार! त्यांची तैलचित्रे विशेष वाखाणली जात. खूपदा ते चिखल व नदी-नाल्यातील गाळ वापरून चित्रे काढत. कधी त्यात स्वत:चे रक्त वापरत. रॉयल ओक या शहरी त्यांची मूळ चित्रे (Original paintings) अरीयाना गॅलरीची शोभा वाढवीत आहेत. याच गॅलरीस त्या चित्रांच्या प्रती विकण्याचा अधिकृत अधिकार आहे. ते जाझप्रेमी! संगीतकार! बासरी व ऑर्गनवादक! १९९०पर्यंत त्यांनी खूप उत्तम चाली बांधल्या. त्यांच्या ध्वनिमुद्रिकांना आजही मागणी आहे. समीक्षकांना त्यात गूढरम्य गेयता जाणवे. या कार्यास वाहून घेतल्यावर त्यांच्या कलाजीवनास ओहोटी लागली. खूपदा कृत्रिम मरणाने मनावर निर्माण झालेला तणाव दूर करण्यास मात्र बासरीवादन चालू राहिले.

अशी मुलखावेगळी माणसे कुठच्या मातीने घडतात ते गूढच! २६ मे १९२८ रोजी पॉन्टियाक येथे (आर्मेनिया) अत्यंत कुशाग्र बुद्धी लाभलेले नि छातीत कलाकाराचे भावुक काळीज दडलेले जॅकोब केवोर्किअन हे बालक जन्मले. गरिबीने त्रस्त पित्यासंगे निर्वासित अवस्थेत अमेरिकेस गेले. ३ जून २०११ रोजी त्याने देह ठेवला, अशी ही सामान्य बाब नाही. मुलखावेगळे काम करण्यास, कलाजीवन संपवणारा, असिधारा व्रतासाठी लौकिक सुखाचा होम करणाऱ्या समर्पित कार्यकर्त्याचे अतीत होणे ही सामान्य बाब असूच शकत नाही. जीवनाचा रस्ता जीवना-हून नेहमीच मोठा असतो. त्यांनी रुजवलेला विचार वार्षिक रोपागत तत्काळ फळ देणारा नव्हताच! उशिरा फुलणाऱ्या वृक्षासारखा तो रुजणार आहे. अवश्य रुजणार आहे!

एखाद्या कामात कधी वाजवी कारणाने वा कधी अकारण 'मग करू' अशी चालढकल होते. जगाच्या मंचावरून ती व्यक्ती अचानक एक्झिट घेते, तेव्हा मला पी.जी. वूडहाउस आठवतो. एकुलत्या एका लाडक्या लेकीने - लिओनाराने देह ठेवला तेव्हा त्याने एका वाक्यात शोक व्यक्त केला होता. डॉक्टर जॅक केवोर्किअन यांचा मृत्यू अकाली झाला असे म्हणता येत नाही. ते अमर आहेत ह्या भ्रमात राहून मी चालढकल केली का, असा मला प्रश्न पडतो. वाईटही वाटते. जाणारा जातो नि उरणारा उसासत राहतो, ही जगरहाटी! हे कळत असूनही त्यांच्या हयातीत लेखन घडले नाही, हा वांझ सल मनात आहे. श्रद्धांजली हा टोचणीचा सल बोथट करण्याचा प्रयत्न! किंचित उतारा!

**- स्मिता भागवत**
smitacap@gmail.com
bhagwats@rogers.com

# जागर हा जाणिवांचा, तुमच्या-माझ्या लेकींचा...

**सुप्रिया सुळे**



काही दिवसांपूर्वी बीडमध्ये स्त्री-भ्रूणहत्येचे प्रकरण उघडकीस आले आणि हा प्रश्न ऐरणीवर आला. शासनयंत्रणेनेही याची दखल घेऊन काम सुरू केले. गर्भपातावेळी मृत पावलेल्या स्त्रीच्या कुटुंबातील पोरक्या झालेल्या तिच्या दुर्दैवी मुलींपर्यंत समाजाच्या सर्व स्तरांतून मदतीचा ओघही सुरू झाला. काही युवा गटांनी आपला राग व्यक्त केला. याचे पडसाद सर्वत्र उमटले. आज स्त्री-भ्रूणहत्येचे गांभीर्य सर्वांच्या लक्षात येत आहे. गेल्या वर्षीच्या जनगणनेच्या आकडेवारी-नंतरच मुलींच्या घटत्या संख्येचे वास्तव सर्वांसमोर आले होते. मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करते त्या बारामतीतही मागच्या वर्षी एक स्त्री-अर्भक कालव्यात टाकून दिलेले आढळले होते. त्या घटनेतील आरोपी नंतर शोधला जाऊन त्यावर कारवाईही झाली होती. पण कायदेशीर कारवाईसोबत समाजात स्त्री-भ्रूणहत्येविरोधात 'जागर' करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे माझ्या लक्षात आले होते. यासाठीच या प्रश्नावर राज्यभरात जनजागृती निर्माण करण्यासाठी आम्ही २०११ च्या ऑगस्ट महिन्यात सावित्रीबाई फुलेंच्या नायगांवपासून पुण्यापर्यंत पदयात्रा काढली होती. गेल्या वर्षभरापासून आम्ही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू केलेला स्त्री-भ्रूणहत्येविरोधातला जागर आज संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेला दिसून येतोय. नुकतीच मी मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात 'जागर'च्या पदयात्रेस जाऊन आले, तेव्हा ही गोष्ट मला प्रामुख्याने जाणवली. युवती व महिलांपर्यंत ज्या पद्धतीने हा प्रश्न पोहोचणे अपेक्षित होते, तसाच तो त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आम्ही बऱ्यापैकी यशस्वी झालो आहोत. अनेक सामाजिक संस्था, संघटनाही या प्रश्नाकडे गांभीर्याने बघत असून त्यांनी त्यांच्या पातळीवर स्त्री-भ्रूणहत्येवर जागरुकता निर्माण करण्याचे काम सुरू केल्याचे मला पत्रव्यवहार, फोन, इ-मेल्सच्या माध्यमातून कळत आहे. मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिळून एक वर्षभरापूर्वी सुरू केलेल्या स्त्री-भ्रूणहत्याविरोधी जागराची दखल घेऊन त्यावर काम उभे राहत आहे, याचा अर्थ आमच्या विधायक कामाची दखल समाजातून घेतली जाते आहे.

यंदाचे वर्ष हे स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दीचे वर्ष म्हणून साजरे होत आहे. पुरोगामी महाराष्ट्राची पायाभरणी करणाऱ्या यशवंतरावजी चव्हाणांचा जन्मशताब्दी सोहळा साजरा करतानाच महाराष्ट्रातील मुलींचे प्रमाण घटत असल्याची धक्कादायक माहिती २०११ च्या जनगणनेतून समोर आली आहे. सन २००१ मध्ये १००० मुलांमागे ९१३ इतके असणारे मुलींचे प्रमाण यंदाच्या आकडेवारीनुसार १००० मुलांमागे ८८३ इतके धक्कादायक-रीत्या कमी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून अनेक उमलत्या कळ्या आईच्या गर्भातच खुडल्या जाताहेत हे वास्तव आहे. पूर्वी धर्माच्या नावाखाली, तर आता विज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या जगण्याचा मूलभूत अधिकारही आज नाकारला जातोय. महात्मा फुले, सावित्रीबाईंचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात आज आपण लिंगसमभावाच्या (जेंडर इक्वॅलिटी) गप्पा मारतो, पण वस्तुस्थिती मात्र वेगळेच काही सांगते. सुबत्ता





असलेल्या भागातही नाकारलेला मुलीचा जन्म, सोनोग्राफी तंत्राचा गैरवापर ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून मी व माझे सहकारी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक प्रश्नांवर काम करीत आहोत, स्त्री-भ्रूणहत्येविरोधात समाजात जागर करणारा 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या-माझ्या लेकींचा' हा कार्यक्रम आम्ही २०११ च्या ऑगस्ट महिन्यात सुरू केला. नायगांव ते पुणे अशा ७० किलोमीटरच्या या पदयात्रेत १८ ते २४ वर्षे वयोगटांतील सुमारे हजार मुली सामील झाल्या होत्या. स्त्री-भ्रूणहत्येविरोधातला हा जागर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात या पदयात्रेतून गेला. तसेच यानिमित्ताने प्रतिष्ठानतर्फे स्त्री-भ्रूणहत्या या विषयावर राज्यस्तरीय निबंधस्पर्धा, पोस्टर मेकिंग, चित्रकला अशा विविध स्पर्धा आम्ही घेतल्या. यामुळे महाराष्ट्रातील युवकांच्या विचारप्रक्रियेस चालना मिळाली, त्याची सुरुवात झाली याचा मला आनंदच आहे. तसेच स्त्रीमुक्ती संघटना, अक्षरा, कोरो, सलाम मुंबई यांसारख्या सामाजिक संघटनाही प्रतिष्ठानशी यानिमित्ताने जोडल्या गेल्यात. पुण्यात आयोजित पुस्तक प्रदर्शनासही चांगलाच प्रतिसाद मिळाला. नायगांव ते पुणे या पदयात्रेनंतर मी व माझ्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रातील विविध भागांत जाऊन स्थानिक पातळीवर पदयात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. औरंगाबाद, नागपूर, नाशिक येथे चव्हाण सेंटरच्या माध्यमातून ३ ते ५ एप्रिल या कालावधीत हा कार्यक्रम घेण्यात आला. मला सांगायला अतिशय आनंद वाटतो, की या सर्वच पदयात्रांना युवतींनी प्रचंड प्रतिसाद देऊन या उपक्रमांत आपला सक्रिय सहभाग नोंदवला. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात उन्हाचा तडाखा असतानादेखील या सगळ्या युवती ज्या तन्मयतेने, उत्साहाने यात सहभागी झाल्या त्याला तर तोडच नव्हती. 'लेक वाचवा, देश वाचवा', 'फूल नही चिंगारी है, हम भारत की नारी है' यांसारख्या घोषणा देत, सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई यांच्या वेशभूषेत युवतींनी तीन ते चार किलोमीटरचे अंतर सहज पार केले. या रॅलींचे आगळेपण म्हणजे स्थानिक पातळीवरील शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था यात मन:पूर्वक सहभागी झाल्या. औरंगाबाद येथे सुमारे अडीच हजार, नागपुरात दोन हजार तर नाशिकला तीन हजार युवती या जागरामध्ये आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सहभागी झाल्या होत्या. या पदयात्रेत घोषणा देतानाचा मुलींचा आवेश, स्त्री-भ्रूणहत्येविषयीची संवेदनशीलता, त्यांच्यात निर्माण झालेली जागृती बघून आम्ही सुरू केलेल्या प्रयत्नांना आजची ही युवती यशस्वीपणे पुढे नेईल याची मला निश्चितच खात्री वाटते. या पदयात्रेत मुलींसोबत फिरताना, त्यांच्याशी संवाद साधताना मला लक्षात आले, की या सर्वच मुली, शहरी असोत वा ग्रामीण, त्या स्वतंत्र विचाराच्या, अतिशय हुशार आणि करियर व लग्न या गोष्टींकडे गंभीरपणे बघणाऱ्या आहेत. अशा युवतींच्या रूपाने उद्याच्या सक्षम महिला महाराष्ट्राला मिळणार असतील तर 'जागर'सारख्या उपक्रमांची आवश्यकताच भासणार नाही.

नायगांवपासून सुरू झालेल्या या स्त्री-भ्रूणहत्येविरोधातल्या जागराच्या दुसऱ्या टप्प्यात मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या विभागांत मी भेटी दिल्या. भौगोलिकदृष्ट्या विभिन्न असलेल्या या भागांतल्या मुलींमध्ये मला दिसून आलेले साम्य हे, की या मुली अत्यंत निर्भीडपणे, संकोच बाजूला सारून प्रश्न विचारतात. या युवतींसमोरची आजची आव्हाने, शिक्षण, करियर याबद्दलची जागरुकता, लग्न आणि कुटुंबसंस्थेविषयीची त्यांची मते हे खुद्द त्यांच्या तोंडून ऐकताना येत्या पन्नास वर्षांतली महाराष्ट्राची महिला अत्यंत सक्षम, कणखर असणार अशी मला खात्री वाटते. करियर आणि घर याचा उत्तम समतोल फक्त एखादी स्त्रीच साधू शकते हे माझ्या व माझ्यासारख्या करियर करणाऱ्या इतर स्त्रियांच्या अनुभवांचे बोल मी मुलींना ऐकवले तेव्हा तर त्यांच्याकडून खूप छान प्रतिसाद मिळत होता. 'बाई'पणाचा इश्यू न करता अंगावर पडलेल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना काय कसरत करावी लागते हे मी एक स्त्री असल्याने चांगलेच अनुभवत आहे. या युवतींशी बोलताना माझेदेखील त्यांच्याशी मनमोकळे शेअरिंग झाले. 'जागर'च्या निमित्ताने झालेल्या जाहीर सभांमधला मुलींचा जल्लोष, स्त्री-भ्रूणहत्येविरोधात

जागृती करणारा लघुपट बघताना उचंबळून आलेल्या त्यांच्या भावना, 'लेक वाचली, वाढली' हे गाणे गुणगुणताना त्यांचे पाणावलेले डोळे, मी गर्भलिंगनिदान करणार नाही, मुलगा-मुलगी भेद ठेवणार नाही ही शपथ घेतानाचा त्यांच्या चेहऱ्यावरचा निश्चय हे सर्व क्षण भी विसरूच शकणार नाही. नागपूरच्या सभेत ८३ वर्षीय आजींनी साश्रू नयनांनी दिलेल्या सदिच्छा, पदयात्रेतल्या मूकबधिर विद्यार्थिनींना साईन लँग्वेजद्वारे सभागृहात काय चालू आहे हे सांगणाऱ्या त्यांच्या शिक्षिका, रहदारीने भरलेल्या रस्त्या-वरच्या लोकांचा उत्स्फूर्त सहभाग, सभागृहात बसायला जागा न मिळाल्याने स्टेजवर येऊन बसलेल्या मुली, रात्रीची ड्युटी करून जागर पदयात्रेत आलेल्या नर्सिंग कॉलेजच्या मुली हे असे काही सुवर्णक्षण या पदयात्रेनिमित्ताने अनुभवण्यास मिळाले. नाशिकच्या सभेत स्त्री-भ्रूणहत्येविरोधातले भारूड, महा-विद्यालयीन मुलींनी सादर केलेल्या नाटिका यांना उपस्थितांनीही छान दाद दिली. भारती नावाच्या तरुणीने 'ताई, मी कलेक्टर होणार आणि माझ्या राज्याच्या विकासात सक्रिय योगदान देणार' असे सांगितले.

'जागर' हा उपक्रम सुरू केल्यानंतर महाराष्ट्रभरातून त्याला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. परिवर्तनशील महाराष्ट्रात मुलींची घटती संख्या चिंताजनक असल्याचे लक्षात आल्यावर खडबडीने जागे झालेला समाज आता या प्रश्नाकडे गांभीर्याने बघतो आहे ही जमेची बाजू आहे. निव्वळ सोनोग्राफी केंद्रांवर धाडी टाकून न थांबता याकडे सामाजिक समस्या म्हणून बघून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्या लागणार आहेत. एका दिवसात समाजाची मानसिकता बदलणार नाही, परंतु फक्त असे हातावर हात ठेवून न बसता, आपल्याला काय करता येईल याचा विचार करून 'जागर'च्या माध्यमातून आम्ही दीर्घकालीन लढ्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले आहे. आमच्या या जागराच्या निमित्ताने सामाजिक अभिसरण घडून आले तर एका मोठ्या सामाजिक प्रश्नाला उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्याचे समाधान आम्हाला निश्चितच मिळेल असे मला मनापासून सांगावेसे वाटते.


**– सुप्रिया सुळे**
supriyassule@gmail.com

## नुकतेच प्रसिद्ध झाले!

# अखेर न्याय मिळाला...

**(भाग १)**

**ॲड. नीलिमा कानेटकर**




**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

ॲड. नीलिमा कानेटकर यांच्या या पुस्तकात पतीपत्नीचं नातं हा जरी मुख्य विषय असला तरी हे पुस्तक फक्त त्याभोवती फिरत नाही.
सर्वोच्च न्यायालय व देशातील इतर उच्च न्यायालयं यांनी दिलेल्या खटल्यांतील निकाल व तद्नुषंगानं नात्यांमधल्या ताणतणावांचं, भावनिक गुंत्यांचं स्वरूप थोडक्यात विषद करून त्या केसचा मथितार्थ त्यांनी वाचकांपुढे ठेवला आहे. घटस्फोटाची विविध कारणं, देशातीलच नव्हे तर परदेशातील न्यायालयांनीही दिलेला न्याय व त्यातील भूमिका यांची मुद्देसूद मांडणी केलेली आहे.
पुस्तकाची मांडणी दोन भागांत मला वाटली. एक म्हणजे, न्यायालयानं ठरवलेल्या खटल्यांवर आधारित असलेले ते गोष्टीरूप लेख व दुसरे, पतीपत्नीच्या नात्यांच्या संदर्भात ज्या अनेकविध समस्या निर्माण होऊ शकतात, त्याबद्दल लिहिलेले माहितीवजा समुपदेशकाच्या भूमिकेतून लिहिलेले लेख.
यात धर्मांतर, सरोगसी, समस्यापूर्ण लैंगिक जीवन, प्रसारमाध्यमांचा हक्क आणि मर्यादा, मिळवत्या स्त्रीच्या कुटुंबातील ताण इत्यादी अनेक विषयांवर नीलिमाताईंनी सांगोपांग विचार मांडला आहे.
थोडक्यात, हे पुस्तक वाचताना वाचकाची नीलिमाताईंशी मैत्री होते आणि पुस्तकाच्या शेवटी त्याला शहाणपणाचं बीज मनात अंकुरल्याचं समजतं.

**– न्यायमूर्ती मृदुला भाटकर**
मुंबई उच्च न्यायालय

# चोळा पॉवर हाउस

## श्रीकांत पेटकर

मागील रेल्वे बजेटमध्ये, चोळा-ठाकुर्ली पॉवर स्टेशनमध्ये पुन्हा नव्याने वीजनिर्मिती सुरू करण्याचे तत्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी जाहीर केले होते. एका वर्षात त्याबाबत काहीही हालचाल झाली नाही. पुन्हा यावर्षी रेल्वे बजेट सादर केले. तृणमूल काँग्रेसमधील मंत्र्यानेच यात चोळा पॉवर स्टेशनबाबत अवाक्षरही नाही.

दर महिन्याला रीडिंग घेण्याच्या उद्देशाने चोळा पॉवर स्टेशन किंवा कल्याण बिजली घर येथे जाणे होते. या चोळा पॉवर स्टेशनबाबत फारशी कोणाला माहिती नसावी.

कुठे आहे हे चोळा पॉवर स्टेशन?

डोंबिवली आणि कल्याण रेल्वे स्टेशनदरम्यान ठाकुर्ली रेल्वे स्टेशन आहे. ठाकुर्ली रेल्वे स्टेशनच्या मागे, पश्चिमेला खाडीपर्यंतचा सारा परिसर म्हणजेच चोळा वा कल्याण बिजली घर होय.

आज तिथे रेल्वेने नव्याने उभारलेले वीज उपकेंद्र दिसते व या उपकेंद्राला टाटा कंपनीची वीज घेतली जाते.

मात्र १९२९ पासून १९८७ पर्यंत चोळा येथेच वीजनिर्मिती होत होती व ती वीज रेल्वेसाठी वापरली जात होती. १९८७च्या डिसेंबरमध्ये या पॉवर हाउसमध्ये मोठा अपघात झाला. बॉयलर हाउसमधील स्टीलचा पाइप फुटल्याने, प्रचंड तापमानाच्या वाफेने कर्मचारी भाजले गेले. होरपळून मृत्युमुखी पडले. त्याकाळचे रेल्वेमंत्री माधवराव शिंदे यांनी वीजनिर्मिती हे रेल्वेचे काम नसल्याचे जाहीर करत डिसेंबर १९८७ पासून हे पॉवर हाउस बंद करण्याचे आदेश दिले. इंग्रजांनी १९२९ मध्ये सुरू केलेल्या या पॉवर हाउसची आज ८०-८५ वर्षांनंतरही गरज आहे, हे सर्वांना माहीत असताना शिंदेसारख्या मंत्र्याच्या दूरदृष्टीची कीव करावी लागेल.

१९५३ साली बोरीबंदर ते ठाणे पहिली रेल्वे धावू लागली. तर काही वर्षांतच ती पुढे कसारामार्गे उत्तरेकडे तर कर्जतमार्गे दक्षिणेकडे पळू लागली.

१९२५ साली विजेवर चालणारी इंजिने आली. रेल्वेला लागणारी वीज टाटा पॉवर लाइनकडून घेतली जायची. तेव्हाच्या रेल्वे विभागाला जी.आय.पी. असे म्हटले जायचे. जी.आय.पी. रेल्वेने स्वत:चे भारतातले पहिले वीजनिर्मिती केंद्र १९२९ साली ठाकुर्ली येथे चोळा पॉवर हाउस या नावाने सुरू केले. स्थानिक लोक याला कल्याण बिजली घर या नावाने ओळखायचे. पॉवर हाउस बांधण्यासाठी ठाकुर्ली येथे रेल्वे थांबू लागली. तिथे रेल्वे स्टेशन उभारले गेले. खाडीलगतच १०० एकर जमीन त्यासाठी खरेदी केली गेली. मोठमोठे बॉयलर वापरून पाण्याची वाफ केली जायची. आजही ते बॉयलर बघायला मिळतात. वाफ करून ती वीज जनित्रांना पुरवली जायची आणि वीजनिर्मिती व्हायची.

१९२९ साली ४ टर्बाइन्सद्वारे ४० मेगावॅट, पुढे २ टर्बाइन्स वाढवून २४ मेगावॅट, तिसऱ्या विस्तारात ३ टर्बाइन्स वाढवून ५६ मेगावॅट आणि शेवटच्या विस्तारात १ टर्बाइन्स वाढवून २८ मेगावॅट याप्रमाणे एकूण १३६ मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती व्हायची.

आज १३६ मेगावॅट इतकी वीज डोंबिवली शहरात विजेची गरज भागवू शकली असती.

वीजनिर्मितीसाठी रोज ३० वॅगन दगडी कोळसा लागायचा हा सर्व कोळसा मध्यप्रदेश, बिहारमधून यायचा. उरलेली राख वीटभट्टीसाठी विकली जायची.

वीजनिर्मितीसाठी लागणारी टर्बाइन्स इंग्लंड, जर्मनी या देशांतून आयात केली जात. तेव्हाच्या काळचे ammeter, voltmeter, relays अजूनही येथे मोठमोठ्या आकारांत आहेत व व्यवस्थित कामही करीत आहेत. आजकाल हॅण्डी डिजिटल मीटरच्या काळात सर्व वस्तू अशा स्वरूपातील असतात.

त्याकाळातील प्रथमोपचार पेटी, सूचनांचे फलक आजही वापरत आहेत. १९२९ पासून १९८७ पर्यंतच्या मुख्य अभियंत्यांची नावे व कार्यकाल अजूनही एका फलकावर आहे. तेव्हाच्या काळातील विटांनी केलेले बांधकाम व आतील सर्व लाकडी फर्निचर अजूनही शाबूत आहे. (बारा बंगला, बावन्न चाळ)

पूर्वी, पॉवर हाउसच्या लगतच्या जमिनीवर ५२ चाळी कर्मचाऱ्यांसाठी उभ्या राहिल्या. ४००च्या जवळपास कुटुंबे यात राहायची. ठाकुर्ली स्टेशनच्या पूर्वेला टेकाडावर 'बारा बंगला' ही अधिकाऱ्यांसाठी वसाहत उभी राहिली. वृक्षराजींनी घेरलेल्या परिसरातील हे बंगले ऐसपैस होते. ब्रिटिश धाटणीचे होते. आज त्या बंगल्यांची दैना दिसून येते, पण श्रीमंतीही कळून येते.

कर्मचाऱ्यांच्या हुद्यानुसार के टाइप, जी टाइप, जे टाइप, एस टाइप अशा प्रकारच्या चाळी होत्या. एक वार खोली, स्वयंपाकघर, व्हरांडा, अंगण, कोपऱ्यात न्हाणीघर व संडास, कौलारू छप्पर, अंगणाला ७-८ फूट उंचीची भिंत आहे.

त्याकाळी जाळावयास दगडी कोळसाच वापरला जायचा. एक जुनी दगडी इमारत आजही उभी आहे ती मूळची रेल्वे इन्स्टिट्यूट.

१९८७ मध्ये पॉवर हाउस बंद झाले आणि १९९० ला यंत्रसामग्री भंगारात विकली गेली. काही यंत्रसामग्री व पॉवर हाउसचे अवशेष अद्यापही आहे.

आज जुने बंगले व नवीन क्वार्टर्ज मिळून जवळजवळ ६० वास्तू आहेत. काही कर्मचारी तिथे राहतही आहेत. वृक्ष व टेकड्यांच्या परिसरामुळे हा परिसर आजही माथेरान व महाबळेश्वरची आठवण करून देणारा आहे.

या अवाढव्य जागेवर-परिसरावर विकासकाचा, बिल्डरांचा डोळा आहे. एम.एम.आर.डी.ए.ही काहीतरी नवीनच सुचवत आहे.

पुरुषोत्तम लिमये. आज वय वर्षे ८२.

१९५२ साली लिमये या पावर हाउसमध्ये ऑक्झिलरी प्लांट ऑपरेटर म्हणून नोकरीला लागले. १९८७च्या एप्रिल महिन्यात निवृत्त झाले. १९५५ ते १९८७ या काळात या चाळीत ते राहत. चाळीची आजची विजनावस्था बघून त्यांचे मन अस्वस्थ होते पण मात्र ते गप्प बसत नाहीत.

रेल्वेबोर्डाशी पत्रव्यवहार, सरकारी दरबारी, रेल्वे मंत्रालयाशी पत्रव्यवहार करतात. वृत्तपत्रातून जनजागृतीचे त्यांच्या परीने प्रयत्न करीत असतात.

वयाच्या ८२ वर्षीही ते हे कार्य मागील वीस वर्षांपासून करीत आहेत. डोंबिवलीतील ग्रंथालयात पुस्तक देणे-घेणे हे कार्यही दिवसभर करीत असतात.

माधवराव शिंदेंसारख्या एखाद्या मंत्र्याला हे पॉवर स्टेशन बंद करावे असे वाटते. पण आजच्या एखाद्या मंत्र्याला हेच केंद्र सुरू करावे असे का वाटत नसावे?

मंत्र्याचं जाऊ द्या नागरीकांनाही का वाटू नये? पुरुषोत्तम लिमये यांच्याएवढे नाही, पण थोडेफार प्रयत्न आपणही का करू शकत नाही. एक पोस्टकार्ड रेल्वे मंत्रालयात महिन्यातून एकदा पाठवले तर...!


वा इतरही मार्ग असतीलच...

महाराष्ट्राला वीजटंचाईच्या समस्येवर नवीन वीजकेंद्रे उभारणे ही काळाची गरज आहे. पण चोळासारखी रेडिमेड वीजकेंद्रे पुन्हा कार्यान्वित होणे गरजेचे आहे.

लिमये यांच्या हयातीत त्यांना हे पॉवर हाउस कार्यान्वित झाल्याचे पाहून, समाधान लाभण्यासाठी आपण आवाज उठवायला हवाच.

**श्रीकांत पेटकर**
९७६९२१३९१३

## ग्रंथालीचे ताजे प्रकाशन




# जैन हिल्सवरील जागरण

**भवरलाल जैन**

जळगावचे उद्योगपती भवरलाल जैन यांची 'रॅग्ज टु रिचेस' कथा सर्वपरिचित आहे, परंतु त्यांना अनुभवाच्या ओघात जे शहाणपण आले ते त्यांच्या वेळोवेळच्या भाषणा-मुलाखतींमधून व्यक्त होते. ते परंपराधिष्ठित तर आहेच, पण काळाला अनुरूपही आहे. त्यामुळे समाजाच्या आजच्या बिकट आणि विकल स्थितीत जैन यांचे प्रतिपादन मोलाचे ठरते. त्याची महती अधिक प्रतीत होते ती त्यामधून येणाऱ्या प्रभावी सूत्रवाक्यांनी. विचारसरणीच्या अभावाच्या सद्यकाळात त्या सूत्रवाक्यांना तत्त्वविचाराचा मोठेपणा लाभतो...

**मूल्य १२० रु**
**सवलतीत ७५ रु.**

# अपराधी कोण?

## डॉ. माधवी मेहेंदळे

तो सगळा आठवडा गडबडीचा गेला. म्हणजे आम्हा सगळ्यांचा मूड तेव्हा खराबच होता. आमच्याबरोबर नेहमी असणारी विशाखा आता आमच्याबरोबर नव्हती. ज्या चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये मी काम करत होते व तीही, त्या हॉस्पिटलच्या मॅनेजमेंटने तिला नोकरीवरून काढले होते.

विशाखा माझी असिस्टंट. अतिशय चटपटीत मुलगी. म्हणजे तरुण स्त्री म्हणायला हवं. त्या चॅरिटेबल हॉस्पिटलतर्फे आम्ही सगळे मिळून एका खेड्यात डोळ्यांचा दवाखाना चालवायला जायचो- आठवड्यातून एक दिवस!

मी डोळे तपासायचे, औषध द्यायचे, चष्मेवाला स्वस्तातले चष्मे द्यायचा. एक लॅब टेक्निशियन- संपत त्याचं नाव- त्यांची रक्त, लघवी, थुंकी वगैरे तपासणी स्वस्तात करून द्यायचा.

विशाखा माझ्या कामात मला मदत करायची. पेशंटचे केसपेपर बनवायचे, भरायचे. त्यांना औषध समजावून द्यायचे. ऑपरेशनच्या तारखा द्यायच्या. ऑपरेशनच्या आधीच्या व नंतरच्या सूचना द्यायच्या. विशाखा हे सगळं तत्परतेनं करायची. ती टापटिपीनं राहायची. त्यातल्या त्यात चांगली साडी चापूनचोपून नेसलेली. डोक्यात गजरा-फुलं. प्रसन्न असायची. प्रसन्न दिसायची. सतत हसतमुख.

फारशी शिकलेली नव्हती पण ती जात्याच हुशार होती. शहरातल्या हॉस्पिटल-मध्येही ती छान काम करायची. ऑपरेशनचे थिएटरमध्ये सगळी औषधं, हत्यारं नीट ठेवणं, ऑपरेशन कपडे आवरून ठेवणं, ऑपरेशनची तयारी करणं, सगळं विशाखा चटचट उरकायची. ती असली की आम्ही सगळे निर्धास्त असायचो. कितीही जास्त पेशंट असले तरी कुठलाही गोंधळ न होता सगळी ऑपरेशन्स शिस्तीत पार पाडायची.

दर गुरुवारी आमची ती बाहेरच्या खेड्यातली व्हिजिट असायची. मला घ्यायला हॉस्पिटलची गाडी यायची. त्यात विशाखा, चष्मेवाला संपत आणि ड्रायव्हर असायचे. मजेत गप्पा मारत, गाणी म्हणत आम्ही तो एक-दीड तासाचा प्रवास करायचो. वाटेत एक सुंदर घाट लागायचा. पावसाळ्यात दोन्ही बाजूंनी हिरवागार डोंगर दिसायचा. थंडीच्या सुरुवातीला रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिवळीधम्मक फुलं गच्च भरलेली असायची. एकंदर आमची ती छान पिकनिक व्हायची.

परत येताना आम्ही कधी कधी विशाखाला तिच्या घराजवळ सोडायचो. तिच्या घराजवळ एक जुनं कुष्ठरोग्यांचं हॉस्पिटल होतं.

पण एकंदर असं सगळं छान चाललेलं असताना अचानक काहीतरी बिनसलं. कानावर आलं की विशाखा व संपत - आमचा लॅब टेक्निशियन- पळून गेले. विशाखाचं लग्न झालेलं आहे व तिला काहीतरी मूलबाळ आहे हे मला माहीत होतं. संपत तर आमच्या हॉस्पिटलजवळच राहायचा. त्याची बायको व दोन मुलं मी बघितलेली होती. त्यामुळे विशाखा संपतबरोबर पळून गेली असं ऐकल्यावर मी हतबुद्ध झाले. विशाखाकडून असं काही अपेक्षित नव्हतं. तीन-चार दिवस दोघांचा काही पत्ता नव्हता.

नंतर ऐकलं की विशाखाचा नवरा चार माणसं गोळा करून, काठ्याबिठ्या घेऊन हॉस्पिटलवर आला. शिवीगाळ केली व निघून गेला.

काही दिवसांनी संपत कामावर रुजू झाला. जणू काही घडलंच नाही अशा थाटात. विशाखा काही दिसेना. चौकशी केली तेव्हा कळलं, की संपत पुन्हा आपल्या बायकोबरोबर राहायला गेला. विशाखाही पुन्हा आपल्या नवऱ्याकडे गेली. तिनं नवऱ्याकडे बरीच गयावया केल्यावर नवऱ्यानं तिला घरात घेतलं, पण आमच्या मॅनेजमेंटनं मात्र तिला नोकरीवरून काढून टाकलं.

विशाखाची हसरी मूर्ती डोळ्यां-समोरून जात नव्हती. तिनं असं का केलं असावं? संपतला तिची जबाबदारी घ्यायची नव्हती तर त्यानं विशाखाला आपल्याबरोबर नेण्याचं एवढं धाडसी पाऊल का उचललं, असे सगळे प्रश्न डोक्याचा भुगा करत होते.

एकदा हॉस्पिटलमध्ये बसले असताना विशाखाचा नवरा तिचा हिशोब पुरा करायला हॉस्पिटलमध्ये आला. तो समोरच दिसला मला. त्याच्याकडे बघून मला जरा धक्काच बसला. हसऱ्या, स्मार्ट विशाखाचा नवरा म्हणून माझ्या मनात तिच्या नवऱ्याबद्दल जी काही काल्पनिक प्रतिमा होती, तिच्याशी पूर्ण विसंगत असा तो होता. त्याला कुष्ठरोग झालेला माझ्या डॉक्टरी डोळ्यांना दिसत होता. कदाचित बरा झालेला असेल. संसर्गजन्य नसेलही, पण त्यामुळे हातापायांत,

चेहऱ्यात आलेलं व्यंग बऱ्याच प्रमाणात दिसत होतं. कुठे हसरी, प्रसन्न विशाखा आणि कुठे हा!

मग मात्र मी स्वत:चा अलिप्ततेचा बुरखा दूर करून तिच्याविषयी सखोल चौकशी करण्याचा प्रयत्न केला. चौकशीत जे समजलं त्यानं अधिकच अस्वस्थ झाले.

विशाखा कुष्ठरोग्यांच्या वस्तीत लहानपणापासून राहते. तिचे आईवडीलही तिथेच राहतात. ती दोघंही कुष्ठरोगी. त्यांच्या वस्तीतल्याच एका कुष्ठरोगी मुलाशी विशाखाचं लग्न आईवडिलांनी लावून दिलं. मुलगी आपल्याजवळ राहावी, आपली सोय व्हावी म्हणून की काय, माहीत नाही.

कथेतली सगळीच पात्रं मला चित्रविचित्र दिसू लागली. कुणाचं चुकलं म्हणायचं यात? सगळेच दोषी दिसू लागले. त्यांना दोषी म्हणणारे आपण कोण हाही विचार होताच मनात सारखा. पण तरी या पात्रांपैकी जास्त अपराध कुणाचा असं वाटायला लागलं.

आईवडिलांचा – ज्यांनी सोयीसाठी आपल्या मुलीचं लग्न रोगी व व्यंग असलेल्या मुलाशी लावून दिलं?

त्या कुष्ठरोगी नवऱ्याचा – ज्यानं स्वत: रोगी असून निरोगी मुलीशी लग्न केलं?

विशाखाचा – जिनं आहे त्या परिस्थितीत नवऱ्याला देव मानून राहायचं नाकारलं, दुसरं आयुष्य शोधायचा प्रयत्न केला?

विशाखाच्या तारुण्याचा – ज्या तारुण्यसुलभ भावनांमुळे तिला निरोगी संपतचं आकर्षण वाटलं?

संपतचा – ज्यानं तिच्याबरोबर चार दिवस मजा मारून अर्ध्या वाटेत तिला टाकून दिलं?

की हॉस्पिटल मॅनेजमेंटचा – ज्यांनी या प्रकरणात तेवढ्याच प्रमाणात दोषी असलेल्या संपतला नोकरीवर कायम ठेवत आणि स्त्री आहे म्हणून की काय, पण जी कामात अतिशय हुशार होती त्या विशाखाला मात्र काढून टाकलं?

सरळ उत्तर मिळण्यासारखे हे प्रश्न नाहीत. वादळानंतर समाजजीवन पुन्हा पूर्ववत सुरू झालं. विशाखाच्या जागेवर दुसरं कुणीतरी लागलं. हॉस्पिटल सुरळीत सुरू होतं.

पण विशाखाचं काय?

तिचं आयुष्य या वादळानंतर कसं असेल?

मला कल्पना करवत नव्हती. मी कल्पना करणं सोडून दिलं. कारण माझ्यासाठी तो मार्ग सोपा होता.


**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश आय हॉस्पिटल
७५९/७५/३ डेक्कन जिमखाना,
कॅफे गुडलक मागे, पुणे-४११००४
भ्रमणध्वनी – ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com




**ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्राचे तीन कवितासंग्रह**





**ओळखीची वाट**
**नीला सत्यनारायण**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**




**दु:ख माझे कोवळे**
**प्रतिभा सराफ**

**मूल्य ६० रु.**
**सवलतीत ३५ रु.**




**वर्तुळ पुसून टाकताना...**
**शारदा नवले**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ४५ रुपये**

**thinkmaharashtra.com या वेबपोर्टलवर महाराष्ट्राची बुद्धिप्रतिभा व चांगुलपणा यांची नोंद करत असतानाच, महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांतील संस्कृतिसंचितदेखील टिपले जाते. येथे वेबपोर्टलवरून पुनर्मुद्रित केले आहेत ते सिंधुदुर्ग जिल्ह्यामदील दोन लेख. तेथील कोटकामते या देवीचा उत्सव चौदा वर्षांनंतर साजरा झाला तो का? आणि तेथील 'तरंग' संस्कृती. दोन्ही लेखांची माहिती ज्योती शेट्ये यांनी संकलित केली.**

**Visit www.thinkmaharashtra.com संपर्क (०२२) २४१८३७१० मुख्य संपादक – दिनकर गांगल**

# श्री देवी भगवती, मुक्काम कोटकामते!

**ज्योती शेट्ये**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगडपासून तीस किलोमीटर अंतरावर कोटकामते हे निसर्गरम्य, टुमदार गाव आहे. पूर्वी त्या गावी एक किल्ला होता. त्याचे अवशेष म्हणून गावात प्रवेश करताना बुरूज व थोडीफार तटबंदी दिसतात. त्या कोटामुळे गावाचे नाव कोटकामते असे पडले. गावाची वस्ती पंधराशेच्या आसपास आहे. दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी तेथे सुमारे पावणेतीनशे वर्षांपूर्वी स्थापना केलेली श्रीभगवतीदेवी हे त्या गावाचे भूषण.

तेथे 'भल्ली भल्ली भावय'च्या जल्लोषात चौदा वर्षांनंतर यंदा प्रथम भावई उत्सव साजरा झाला. श्री देवी भगवतीच्या प्रांगणात ढोल-ताशांच्या तालावर आबालवृद्ध भावईच्या सोबतीने चिखलात रंगले होते, तर महिला कळश्यांचा नवस फेडण्यात दंगल्या होत्या!

कान्होजी आंग्रे ह्यानी गोव्यातून वारंवार होणाऱ्या पोर्तुगीज हल्ल्यांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वत:च्या शौर्याच्या लढायांबरोबरच श्री देवी भगवतीला साकडे घातले. त्यानुसार देवी नवसास पावलीदेखील, तेव्हा त्यांनी भगवतीचे मंदिर बांधले. बघता बघता, तिचा लौकिक जागृत व नवसाला पावणारी देवता म्हणून पसरला.



कोटकामते येथील भगवती मंदिर

मंदिरात प्रवेश करतानाच कान्होजी आंग्रे यांच्या काळामधील कोरीव काम आणि मंदिराची भव्यता डोळ्यांत भरून राहते. तेथील पुरातन वड-पिंपळाच्या वृक्षांचे पार आणि देवीचे वाहन असणारी सिंहप्रतिमा बघून आदर तयार होतो. प्रवेश-पायरीशी उलट्या पुरलेल्या दोन तोफा दिसतात. एकाच वेळी साताठशे जण बसू शकतील असा भव्य सभामंडप, त्याचे लाकडी खांब, त्यांवरील कोरीव काम, महिरपदार कमानी, चिरेबंदी फरशी आणि सहज वाचता येणारा शिलालेख हे या मंदिराचे विशेष आहेत.

सहा प्रचंड लाकडी खांबांनी तोललेली तक्तपोशी, प्रत्येक खांबाचा प्रचंड परीघ, वरचा कोरीव भाग, जुन्या घंटा, चार प्रमुख देवतांचे तरंग (सिंधुदुर्ग जिल्ह्याचे तरंग संस्कृती हे वैशिष्ट्य आहे.) आणि अतिसुंदर सुबक, रेखीव श्री भगवतीची मूर्ती, शेजारचे लामणदिवे.... हे सारे मन लुभावून टाकणारे आहे.

श्रीदेव रवळनाथ, श्री देव हनुमान, उंच पाटावर निशाण उभारण्यासाठी असलेली आणखी उंच लाकडी डोलकाठी, मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर असणारी संगमरवरी श्री पावणादेवी, तेथील लाकडी नक्षीकाम, दीपमाळ, कलात्मक बांधणीची पिण्याच्या पाण्याची विहीर, भक्तजनांच्या सोयीसाठी बांधलेली धर्मशाळा या गोष्टी मनाला आणखी



श्री देवी भगवती

भुरळ घालतात.

ह्या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील जमिनीच्या सात-बारा उताऱ्यावर प्रमुख कब्जेदार इनामदार म्हणून श्री देवी भगवती संस्थान, कोटकामते असा ठळक उल्लेख करण्यात आला आहे! इतिहासकालीन संस्थाने खालसा झाली असली तरी हे गाव इनाम म्हणून देवस्थानाला दिलेले आहे.

तेथे भावई उत्सव आषाढी पौर्णिमेपासून तीन दिवस साजरा होतो. पहिल्या दिवशी इतलायी देवी (हे राजसत्ता स्थळ) आणि पावणाईच्या स्थळात प्रत्येकी सहा कोंबड्यांचा बळी दिला जातो. बळी द्यायच्या कोंबड्यांना देवीने बघू नये म्हणून केळीच्या किंवा चवईच्या पानांनी झाकतात. श्रीपावणाई ही ग्रामदेवता, ग्रामदेवतेची पूजा ही केवळ भक्तिभावातून निघालेली नसून ती भयातून उगम पावलेली आहे. तिने गावावर कसले विघ्न आणू नये म्हणून तिची पूजा किंवा जत्रा होते. तिला पूजा-नैवेद्याची गरज नसते. तिला तहान असते ती कोंबड्याच्या, बकऱ्यांच्या किंवा रेड्याच्या रक्ताची! ती वर्षातून एकदा भागवली की ती वर्षभर गावाच्या वाटेला जात नाही अशी समजूत आहे.

उत्सवाच्या दुसऱ्याच दिवशी चार मुलांना लुगडी नेसवून त्यांना जोगिणी बनवले जाते आणि एका मुलाला पंचा नेसवून काळ केले जाते. कापर काठी, कापर काठी उदेव असे म्हणत जोगिणींना देऊळवाडीत फिरवतात. देवळात गाऱ्हाणे झाले की जोगिणी मानकरी पोकम ह्यांच्या घरी जातात. तिथे जोगिणींची पूजा होऊन त्यांना जोगवा देण्यात येतो. त्यानंतर सर्व घरांत जोगवा मागितला जातो. हा जोगवा मग वाटून घेतला जातो.


मुलांना जोगिणी बनवण्याच्या प्रथेबद्दल असे वाचनात आले, की पुरुषाने लुगडे वेढून घेणे ही प्रथा केवळ गंमत म्हणून अनुसरली जात नाही. कोण्या अज्ञात काळी बायका ग्रामदेवतांचे पौरोहित्य करत असत, याची ती साक्ष आहे. स्त्रीचा पौरोहित्याचा अधिकार पुरुषाने बळजबरीने हिरावून घेतला असला पाहिजे आणि मग ग्रामदेवतेला फसवण्यासाठी त्याने धोतरावर लुगड्याचा घोळ घातला असला पाहिजे. किंवा गोवा-कर्नाटकात जोगतिणी, देवदासी ह्या अनिष्ट प्रथा बंद व्हाव्यात म्हणूनही ही नवीन प्रथा सुरू झाली असेल.

देवस्थानाच्या कारभारात काम करताना अग्रक्रम मिळालेल्या कुटुंबांना मानकरी म्हणतात. वंशपरंपरागत हा मान महार (आता बौद्ध), गावकार, सुतार, ठाकूर, मिराशी(ब्राम्हण) ह्यांना मिळतो.

तिसऱ्या दिवशी सकाळी खापरा चाळ्याची आणि खापर मुकुटाची (मुखवटा) पूजा केली जाते. खापरा चाळा हा देवस्कीचा भाग असतो. देवस्कीमध्ये सर्व पूजा येतात. देवस्की हे गावाचे केंद्र होते/असते. त्याचे घटक तीन: १.बारा-पाचाची देवस्की, २.तरंग, ३.ग्रामदेवता. बारा-पाचाच्या देवस्कीमध्ये वंस व पूर्वस यांचा भाग महत्त्वाचा असतो. हे वंस (-मूळपुरुष-) व पूर्वस (पूर्वज) देवस्की सुरू करण्याच्या वेळी मनुष्याच्या अंगात संचार करतात. त्या संचाराला अवसर-वारे देणे, अंगात येणे, शिवकळा येणे यांपैकी काहीही म्हणतात. वंस-पूर्वसाच्या अधिकारी देवता वेगवेगळ्या असून त्यांचे वंस-पूर्वस प्रत्येक स्थळात असतात. अशी बारा स्थळे असतात. पहिले स्थळ हे पूर्णसत्तेचे (किंवा मूळ भूमिकेचे). देवस्कीची सुरुवात ह्या स्थळाच्या साक्षीने व्हावी लागते. देवळाच्या गाभाऱ्यात दोन्ही बाजूंस दोन मूर्ती असतात. उजवीकडील मूर्ती ही बारांचा पूर्वस आणि डावीकडील मूर्ती हा मायेचा पूर्वस. ह्या दोन्ही पूर्वसांपुढे देवाच्या नावाने बाहेर बळी देतात. त्यास देवाचा चाळा म्हणतात.



मंदिराचा भव्य सभामंडप



शिवकळा – देवतांचा अंगात होणार संचार

तो चाळा मुख्य देवळाच्या बाहेर असतो.

श्री देवी भगवती मंदिराबाहेर असणारा खापर चाळा हा तीन चौरस फुटाचा दगडी चौथरा आहे. उत्सवात त्यावर खापर म्हणजे लाकडाचा राक्षससदृश मुखवटा ठेवण्यात येतो व तो लुगड्याने वेढण्यात येतो. ह्या मुखवट्या-वर तांबड्या माळात खंजीर ठेवलेला असतो.

खापर चाळ्याची पूजा झाल्यानंतर दुपारी मंदिराचा मानकरी सुतार (मेस्त्री) यांना ग्रामस्थ उचलून आणतात. मिराशी म्हणजे ब्राम्हण मानकऱ्याला (भट) आणण्याची प्रथा मात्र वेगळीच आहे. त्याची प्रेतयात्रा मयताचा विधी करतच आणली जाते. भटाला मंदिरात आणून मातीचे मडके घाडी हा मानकरी फोडतो. ह्या प्रथेमागची आख्यायिका अशी, की अनेक पिढ्यांपूर्वी, एका वर्षी ह्या उत्सवाच्या दिवशीच मानकरी मिराशी मृत झाला, तर देवाकडून (म्हणजे अंगात आलेल्या अवसऱ्याकडून) असे सांगण्यात आले, की आहे तसा त्या भटाला देवळात घेऊन या. मग त्या भटाची प्रेतयात्रा देवळात आली, प्रेत देवळात ठेवले गेले, तर थोड्या वेळात तो भट जिवंत झाला! तेव्हापासून भटाची प्रेतयात्रा काढतात.

असंख्य लोकांच्या उपस्थितीत, वाद्याच्या गजरात भावई शिवकळा (म्हणजे देवीने ज्याच्या अंगात संचार केला असेल ती मानकरी व्यक्ती) खापरा चाळ्याकडे झेपावते, तिथले खापर (मुखवटा) डोक्यावर धारण करून, त्यातल्या खंजिराने कोंबड्याचा बळी देऊन भगवतीच्या प्रांगणात येते. ती शिवकळा त्या क्षणी जणू खापर भावई असते. बळी दिलेले कोंबडे मानकरी वाटून घेतात.

**असा तीन दिवसांचा उत्सव!**

भावईसमोर मनोकामना पूर्ण झाल्यास पाण्याने भरलेल्या पाच, अकरा कळश्या देवीच्या चरणांवर ओतण्याचा नवस बोलला जातो आणि तो फेडण्यासाठी महिलांची झुंबड उडते. त्या पाण्यानेच सगळीकडे चिखल होतो आणि तो तुडवण्यात, त्या चिखलात लोळण्यात, 'भल्ली भावई'च्या जल्लोषात आबालवृद्ध दंग होतात.

भावई म्हणजेच श्रीदेवी भगवतीची शिवकळा (अंगात न संचारल्यामुळे) येत नसल्याने आणि खापरा देवीचे खापर (मुखवटा) चोरीस गेल्यामुळे उत्सवाची ही परंपरा चौदा वर्षांपूर्वी खंडित झाली होती. यंदा एका मानकऱ्याच्या मुलात शिवकळा आली आणि खापरदेवाचा नवीन मुखवटा बनवून ह्या वर्षी उत्सव मोठ्या उत्साहात घडून आला.


गावातल्या लोकांचे दु:ख, क्लेश, आजार इत्यादी दूर होऊन, सर्वत्र सुबत्ता येण्यासाठी, अन्नधान्य पिकण्यासाठी उत्सव होत असल्याचे देवस्थानाचे विद्यमान मिराशी कामतेकर ह्यांनी सांगितले. त्याच्या मते, तिथला दहा दिवस चालणारा नवरात्र उत्सव फार सुंदर असतो. नवरात्र पूर्ण लांबीचा चित्रपट असेल तर भावई हा त्याचा ट्रेलर!

# तरंग व बारापाचाची देवस्की

आचरा नदीने रत्नागिरी जिल्ह्याचे दोन भाग केले आहेत. पैकी दक्षिणेकडचा भाग म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हा. ती संस्कृती गोव्याला जवळची, ती रत्नागिरी-रायगड जिल्ह्यांहून वेगळी आहे. त्या भागात धर्मक्षेत्रात एक वेगळी 'तरंग' संस्कृती नांदत होती. त्या भागातील रवळनाथ, माउली, सातेर, वेतोबा ही देवस्थाने इतरत्र सापडत नाहीत.

तरंग म्हणजे देवस्थानास आवश्यक असलेले विशेष प्रकारचे उपकरण. वेळूच्या जाडीइतक्या लाकडी दांड्याच्या एका टोकाला लुगडे गुंडाळून भलामोठा बोंगा करतात. रवळनाथ, भूतनाथ, वेताळ, भैरव इत्यादी देवांच्या आणि सातेरी, माउली यांसारख्या भूमिदेवतांच्या देवळांत 'तरंगे' असतात. ती दसरा, शिमगा, जत्रा अशा वेळी बाहेर काढून, गुरव किंवा भगत खांद्यावर घेतात. तरंग खांद्यावर घेणाऱ्यांच्या अंगात त्या त्या देवतेचे वारे येते. मग अंगातील देवाकडून भक्तगण कौल, प्रसाद घेतात. ही तरंगे जत्रेत व गावच्या पंचक्रोशीत फिरून परत मंदिरांत येतात. तरंगांचा संचार ही प्रथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे खास वैशिष्ट्य आहे.

जिल्ह्यातील सर्व जातींच्या घरांतून कुळधर्म व कुळाचार पाळण्याची प्रवृत्ती कायम आहे. अशी परंपरा राखण्यात स्त्रियांचा वाटा अधिक आहे. कोणत्याही कार्यास हात घालताना देवाचा कौल (त्याला प्रसाद घेणे म्हणतात) लावण्याची प्रथा आहे. कौलाची ही पद्धत वेगवेगळ्या देवस्थानांत वेगवेगळ्या प्रकारची आहे. काही देवळांत दगडी पूजा-मूर्तीला करमळीच्या झाडाची पाने किंवा पिटकुळीचे कळे यांचे प्रसाद लावतात. इतर काही ठिकाणी चौकावरील मूर्तीला किंवा



जत्रेमध्ये हे तरंग खांद्यावर घेऊन नाचवले जातात

खांबाला प्रसाद लावतात. कधी पानांकळ्यां–ऐवजी उकडे तांदूळ वापरतात. फुले, तांदूळ, पाने उजवीकडे किंवा डावीकडे पडतात. त्यावरून प्रसाद घेणारा भटजी किंवा गुरव देवाच्या बोलण्याचा अर्थ विशद करून सांगतो.

बारा–पाच हा दक्षिण कोकणातील गूढ संप्रदाय आहे. त्या संप्रदायाची निर्मिती कधी व केव्हा झाली ह्यासंबंधी मतभेद आहेत.

बारा–पाचच्या देवस्कीत महार, गावडे व अन्य लोकांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्याचे कारण कोकणात पहिली वसाहत महार लोकांनी केली अशी समजूत आहे. गाव देवस्कीत महारास अधिकार होता. बारा–पाच संप्रदायात महाराची बेळा व पान अशी दोन स्थळे आहेत. परंतु नंतर महार उपेक्षित झाला. आता तर, महार ही संज्ञा कालबाह्य ठरली असून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आहे.

बारा–पाचाचे गणित एक करणाऱ्या गाऱ्हाण्यातील पाच देव कोण? तर विष्णू, गणपती, सूर्य, देवी आणि शिव या शंकराचार्यांनी रूढ केलेल्या पाच देवता होत असा समज आहे. बारा स्थळांत प्रत्येकी एक याप्रमाणे बारा वंस (वंश) आहेत. त्याशिवाय पूर्वसत्तेच्या स्थळात मायेचा म्हणजे माहेरचा व बाराचा असे दोन पूर्वस (पूर्वज) आणि रवळनाथ, भूतनाथ व पावणाई यांचे प्रत्येकी एक असे तीन पूर्वस, असे मिळून एकूण पाचांची संख्या पुरी होते असाही समज दृढ झाला.

देवस्कीचे मुख्य घटक तीन आहेत : १. बारा–पाचाची देवस्की, २. तरंगे, ३. ग्राम–देवता. वंस व पूर्वस हे देवस्की सुरू करण्याच्या वेळी मनुष्याच्या अंगात संचार करतात. या संचाराला अवसर, वारे देणे, अंधार उभा राहणे असे शब्द रूढ आहेत. त्यास शिवकळा येणे असेही म्हणतात. या वंस–पूर्वसाच्या अधिकारी देवता वेगवेगळ्या असून त्यांचे वंस–पूर्वस प्रत्येक स्थळात असतात.

**बारा–पाचाची देवस्की**

**पहिले स्थळ – पूर्वसत्ता :** (पूर्वी किंवा मूळ भूमिका) : देवस्कीची सुरुवात या स्थळाच्या साक्षीने व्हावी लागते. देवळात दगड पुजलेला असतो. त्याच देवळात हात जोडून उभी मूर्ती असते. तिचा ज्याच्याकडे स्थळ असते त्यास वंस म्हणतात. हे स्थळ ज्याच्याकडे असते त्याच्याकडे या स्थळाची पूजा करण्याचा मान असतो. बारांचा पूर्वस व मायेचा पूर्वस (माहेरचा पूर्वस), दोन्ही पूर्वसांपुढे देवाच्या नावाने बाहेर बळी देतात. त्यास देवाचा 'चाळा' म्हणतात. तो चाळा देवळाबाहेर असतो. ह्या स्थळात मायेचा पूर्वस, बाराचा पूर्वस व हे स्थळ चालवणाऱ्या कुळांचा वंस अशी तीन स्थाने येतात.

**दुसरे स्थळ – राजसत्ता (विठ्ठलादेवी) :** या स्थळाची मुख्य देवी भगवती. या मूर्तीजवळ दुसरी चतुर्भुज मूर्ती असते. तिला विठ्ठलादेवीचा चाळा म्हणतात. हे स्थळ ज्याच्याकडे असते त्याचा वंस जवळच असतो. विठ्ठलादेवीला 'इटलाई' देवी असेही म्हणतात.

**तिसरे स्थळ – गावडा :** या स्थळात पुरुष व स्त्री अशा दोन मूर्ती असतात. ज्याच्याकडे हे स्थळ असते, त्याचा वंस म्हणून एक दगड पुजलेला असतो.

**चौथे स्थळ – गांगो :** हा एक दगड पुजलेला असतो. हे स्थळ घाडी पाहतात.

**पाचवे स्थळ – खातया (रामपुरुष, सुतारदेव) :** ह्या स्थळात नवरा व बायको अशा दोन मूर्ती असून नवऱ्याच्या उजव्या हातात तलवार व डाव्या हातात ढाल असून उजव्या बाजूस हातोडा व डाव्या बाजूस चिमटा अशी शस्त्रे असतात. हे स्थळ सुताराकडे असून, मूर्तीजवळ सुतार वंस म्हणून एक दगड पुजलेला असतो.

**सहावे स्थळ – मडवळ :** हा एक दगड पुजलेला असतो. हे स्थळ धोब्याकडे असते. मडवळ या मूळ कानडी शब्दाचा अर्थ धोबी असा आहे.

**सातवे स्थळ – जैन :** या स्थळात शिवलिंग हा मुख्य देव, नंदी, गणपती, एक किंवा अधिक पुरुषांच्या मूर्ती आसन, मांडी घालून, हात जोडून ध्यानस्थ बसलेल्या असतात. यातल्या एका मूर्तीस जैनास वंस किंवा नितकारी म्हणतात. मग आरंभी नारळ ठेवून गाऱ्हाणे करतात. हे स्थळ लिंगायत गुरव किंवा जंगम यांच्याकडे असते.

**आठवे स्थळ – ब्राम्हण :** बारांचा ब्राम्हण हा एक दगड पुजलेला असतो. हे स्थळ कऱ्हाडे ब्राम्हणाकडे असते.

**नववे स्थळ – कूळ :** या स्थळात पाण्याने भरलेली झारी पूजेस लावतात. या ठिकाणी बळी देतात. हे स्थळ ज्याच्याकडे असते त्याला कुलकार म्हणतात.

**दहावे स्थळ – भराडी (भद्रकाली, भवाई) :** या स्थळात मांडी घालून बसलेली देवीची मूर्ती असून तिच्या दोन्ही हातांत शस्त्र व दोन्ही बाजूंस पशूंचे देह व पक्ष्यांची तोंडे अशी चित्रे असतात. ह्या देवीला बळी अर्पण करतात.

**अकरावे स्थळ – बेळा :** हे महाराचे स्थळ असून त्या गावाचा बेळा महार ते स्थळ पुजतो. त्यात अंतर्भूत असलेले निरनिराळे दगड पुजले जातात.

**बारावे स्थळ – पान :** हे स्थळ देखील महाराचे असून त्या गावाचा पान महार हे स्थळ पुजतो.

बेळा महार व पान महार यांच्या स्थळात पुजणाऱ्या देवतांची नावे साळबाई. सोमय्या, अज्ञात महालक्ष्मी, झोलाई, खेमाई वीर, मनाई, पडलाई, भैरीभवानी, काळकाई, वाघाई, जखाई अशी सांगितली जातात.

अकारी पुरुष देवस्कीत गाव जोडला म्हणून अकारी पुरुष ही देवता मानली जाते. गाव वसवणारा पुरुष म्हणून ह्याला महत्त्वाचे स्थान आहे.

**– ज्योती शेट्ये**
भ्रमणध्वनी: ९८२०७३७३०१
jyotishalaka@gmail.com

# वादग्रस्त चित्रपट आणि नैतिकता

## अरुण पुराणिक

साधारण शंभर वर्षांपूर्वी दादासाहेब फाळके यांनी सिनेउद्योगाचा पाया रचला आणि ही नुकतीच उमलायला लागलेली कला फुलू लागली. त्याचबरोबर चित्रपट आणि वाद यांचे कधीही न संपणारे असे एक नवे नाते जन्माला आले. निर्माते जनतेची आवडनिवड लक्षात घेऊन, अनेक अडचणींना तोंड देऊन, आपले सर्वस्व पणाला लावून चित्रपटनिर्मिती करू लागले. त्यांनी सामाजिक, रामॅण्टिक, काल्पनिक, पोशाखी, साहसी (स्टंट), भय (हॉरर), रहस्यमय, हास्य (विनोदी) अशा नानाविध विषयांवर चित्रपटनिर्मिती केली. या सिनेनिर्मात्यांचे अनेक प्रकार आहेत. काही फक्त पुरातन काळातील धार्मिक, ऐतिहासिक, पौराणिक विषयांवर बोधप्रद, आदर्शवादी चित्रपटांची निर्मिती करतात, काही धाडसी निर्माते चाकोरीबाह्य विषयाला हात घालून समाजातील अनिष्ट चाली, रूढी, परंपरांच्या विरुद्ध आवाज उठवतात. काही पुढे जाऊन कलेच्या नावाखाली लोकांना पचनी पडण्यास कठीण असे 'अवास्तव' वास्तव दाखवतात. काही प्रवाहाविरुद्ध जाऊन 'सनसनाटी' निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, तर काही गाजलेल्या व्यक्तिरेखांवर चित्रपटनिर्मिती करून, कळत-नकळत त्यांच्या विषयीच्या श्रद्धेला धक्का लावतात. निर्मात्यांचा हा वर्ग नेहमीच टीकेच्या भोवऱ्यात अडकतो.


राजकारण आणि चित्रपट हे आपल्याकडचे सर्वाधिक चर्वण केले जाणारे संवेदनशील विषय! यावर आपले मत मांडायला व ते इतरांवर लादायला अनेकांना मनापासून आवडते. सनदशीर मार्गाने टीका करणे हे समाजाच्या हिताचे व जिवंतपणाचे लक्षण आहे. मात्र टीकेला हिंसेची साथ मिळताच ती अधिकच जहरी आणि हिंस्र होते. तिची लगेच दखल घेतली जाते. रातोरात पोस्टर्स फाडली जातात. थिएटरवर दगडफेकही होते. निर्माते घाबरून लगेच परिस्थितीला शरण जातात, सरकारही खडबडून जागे होते. वाद निर्माण होण्यास क्षुल्लक कारणही पुरेसे असते. मात्र या टीकेतसुद्धा बऱ्याच वेळा दुटप्पीपणाचा भाव पाहायला मिळतो. अनेकदा धंदेवाईक लोकांकडून वाद मुद्दाम निर्माण केले जातात. वादांचा मागोवा घेतल्यास जनमनाची तर्कसंगती लागत नाही. वाद निर्माण होतात. समाजात खळबळ माजवून निवळतात. परत नवीन वाद होतात. हे चक्र गेली पाऊणशे वर्षे तरी चालूच आहे. त्याचाच एक आढावा...

मास्टर निसार हा मुस्लिम कलाकार आहे म्हणून त्याने बिल्व मंगल ऊर्फ 'सूरदास'मध्ये (१९३२) काम करणे योग्य नाही अशी टीका करणाऱ्या लोकांना इंपीरियलच्या 'द्रौपदी' मध्ये (१९३१) खलिलने मुस्लिम असून कृष्णाची भूमिका केलेली चालली. इंपीरियलच्या 'अनारकली'ची (१९३५) पहिली प्रिंट तर जाळण्यात आली. 'आम्हाला कुणाच्याही धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत' हा संदेश घेऊन दुसरी प्रिंट काढण्यात आली. त्याविरुद्धही अपप्रचार झाला. कारण काय, तर म्हणे चित्रपटात रंगवलेली व्यक्तिरेखा प्रत्यक्ष मुघल बादशहाच्या प्रतिमेशी थोडी विसंगत आहे. सिनेमाच्या कथेत आणि ऐतिहासिक तपशिलात फरक आहे, वगैरे वगैरे! अशा परिस्थितीत त्या निर्मात्याने काय करायचे? दोन मान्यवर इतिहास संशोधकांतही मतभिन्नता आढळते, तिथे हा फिल्मी कथालेखक आणि निर्माता काय करणार?

सोहराब मोदींनी जहांगीरचा न्यायनिष्ठुरपणा दाखवणाऱ्या 'पुकार'ची (१९३९) निर्मिती केली. पटकथा, संवाद कमाल अमरोहींचे होते. त्यामध्ये जहांगीरचे अती मद्यसेवन, क्रूर स्वभाव, कलेचा भोक्तेपणा, नूरजहानचा पोलादी कणखरपणा आदी गुणावगुणांचा अभाव असल्यामुळे टीका झाली होती. गोवारीकरांच्या जोधा-अकबरच्या प्रदर्शनाला रजपूत समाजाचाही सुरुवातीच्या काळात विरोधच होता. पण गोवारीकर डगमगले नाहीत. बोलपटांच्या सुरुवातीच्या काळात, आपल्याविषयी कोणताही पूर्वग्रहदूषित समज नसावा व आपले नाव नीट लक्षात राहावे म्हणून अनेक मुस्लिम कलाकारांनी हिंदू नावे धारण केली होती. भालजी पेंढारकरांनी 'साहेबानू लाटकर'चे 'सुलोचना' असे नामकरण केले हे सांगावे लागते. एचएमव्हीने गायिका शमशाद बेगमच्या आवाजात भजनाच्या ध्वनिमुद्रिका काढल्या होत्या, पण त्यासाठी तिचे नाव बदलून चन्दाराणी ठेवले होते. प्रभातच्या 'पडोसी'मध्ये, मिर्झाची भूमिका गजानन जहागीरदार यांनी तर जिवबाची भूमिका मजहर खानने केली होती. दोन जमातींत स्नेहसंबंध वाढवणाऱ्या या चित्रपटाला दर्शकांनी डोक्यावर घेतले होते.



'पडोसी'मध्ये, मिर्झाची भूमिका गजानन जहागीरदार




'संग्राम'मध्ये अशोककुमार

त्यांचा धर्म भूमिकेच्या आड आला नव्हता.

बॉम्बे टॉकिजच्या 'झूला'मधील मुमताज अलीच्या एका गाण्यात 'अल्ला की कसम' असे शब्द आले होते. बस्स! त्यावरून ठिणगी पडली आणि गिरगावातील रॉक्सीच्या गल्लीत, १९४१-४२ सालामध्ये दंगल पेटली. शेवटी ते शब्द गाण्यातून काढून टाकावे लागले. १९४७ दमयंती सहानीचा (बलराज सहानी यांची पत्नी) 'एक कदम' रॉक्सीला प्रदर्शित झाला होता. त्यातील एका गाण्यावरून अनर्थ घडला. दंगलखोरांनी थिएटरच्या आत घुसून तिथला पडदाच जाळून टाकला. सेंसॉर संमत होऊनही 'एक कदम'वर बंदी घालण्यात आली. पृथ्वीराज कपूर हा हिंदू नाट्यनिर्माता 'पठाण' या मुस्लिम विषयावर नाटक करतो म्हणून ऑपेरा हाउस परिसरातील वातावरण एकेकाळी तंग झाले होते.

'हम'मधील एका व्यक्तिरेखेचे नाव जुम्मा! त्यावरून 'जुम्मा, चुम्मा दे दे' गाण्याची निर्मिती करण्यात आली होती. आता 'जुम्मा' शुक्रवार हा मुस्लिमधर्मीयांचा पवित्र दिवस! यावरून गैरसमज होऊन खळबळ माजली होती. यावरून जनतेच्या धार्मिक भावना किती नाजूक आहेत आणि त्यापेक्षा अत्यंत महत्त्वाचे म्हणजे जात्यंध दंगलखोरांची किती जबरदस्त दहशत आहे याचा पुरेपूर अंदाज येतो. याचा अर्थ धार्मिक, ऐतिहासिक विषयावर कुणी चित्रपट बनवायचेच नाहीत काय? परत अशा नाजूक विषयावर चित्रपट-निर्मिती करताना एखादी क्षुल्लकशी चूक झालीच तर दुसऱ्या बाजूने स्वत:चे डोके फोडून घेण्याची पाळी! मुळात कुणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा कुणाही निर्मात्याचा उद्देश नसतो. त्याला आपला धंदा करायचा असतो. चित्रपटनिर्मिती करत असताना कुणाच्याही भावना दुखवल्या जाऊ नयेत अशी तो काळजी करत बसला तर तो भुकेकंगाल तरी होईल नाही तर ठार वेडा तरी होईल! निखळ मनोरंजनासाठी कधी कधी वस्तुस्थितीतही नाट्यमयता आणावी लागते, हे या लोकांना समजत नाही. चित्रपटाचे भवितव्य सिनेप्रेक्षकांनाच ठरवू दे की! मायबाप प्रेक्षकांचा निर्णय सर्वांनाच शिरसावंद्य असेल!

साहेराब मोदी यांचे सिकंदर, पुकार, पृथ्वीवल्लभ हे ऐतिहासिक चित्रपट प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. परंतु त्यांच्याच भव्यदिव्य 'झांसी की रानी'कडे प्रेक्षकांनी चक्क पाठ फिरवली. कारण थोराड मेहताब वीस वर्षांच्या झांसीच्या राणीच्या भूमिकेत बिलकूल शोभत नव्हती. मोदींनी साकार केलेली राजगुरूची भूमिका इतिहासाशी पूर्णपणे विसंगत होती. या चित्रपटाचे भवितव्य प्रेक्षकांनी ठरवले. यासाठी कुणा धर्मसंस्कृती रक्षकाची, राजकीय नेत्याची, जहाल पत्रकाराची किंवा रस्त्यावरील भाडोत्री गुंडांची गरज भासली नाही. निर्मात्याला आपली चूक उमगली.

टीकाकारांना टीका करताना कसलीही किंमत मोजावी लागत नाही. मिळालाच तर मोठेपणा मिळतो, समाजाचे नेतृत्व मिळते, फुकटची प्रसिद्धी मिळते. याउलट निर्मात्याच्या नशिबी फक्त नुकसान व मन:स्ताप असतो. तेव्हा पत्रकार, समीक्षक, धार्मिक नेते, जहाल संघटनांनी 'हा सिनेमा आहे' हे लक्षात घेऊन, धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक व चाकोरीबाह्य चित्रपटांच्या बाबतीत थोडा उदार दृष्टिकोन आणि नरमाईचे धोरण स्वीकारण्यास काय हरकत आहे? टीका अवश्य करा, त्यातूनच सुधारणा होत राहील! परंतु एखाद्याला आयुष्यातून उठवणे कितपत योग्य आहे?

बॉम्बे टॉकिजच्या 'संग्राम'मध्ये (१९५०) नायक अशोककुमार पोलिसांना भररस्त्यावर बदडून काढतो असे दृश्य आहे. प्रेक्षक टाळ्या, शिट्ट्या वाजवून या प्रसंगाला प्रतिसाद देत. आपल्या पोलिसांची या प्रसंगामुळे बेअब्रू होत आहे हे पंधरा आठवड्यांनंतर सरकारच्या ध्यानात आले. मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी गंभीर दखल घेऊन, या चित्रपटाचे प्रदर्शन बंद करायला लावले. त्यांना तात्पुरती लोकप्रियताही मिळाली. मोरारजींनी कठोरपणे दारूबंदी अमलात आणली, म्हणून लोकांनी दारू प्यायची सोडून दिली का? सिमेनातील हवालदार हा तर नेहमीच टिंगलीचा विषय असतो. पोलिस खात्याच्या अब्रूची लक्तरे

वेशीवर टांगणाऱ्या सिनेनिर्मात्यांना पोलिसांचा धाक का वाटत नाही? आज कॉपीराइट कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सिने-उद्योगाला पोलिसांचीच मदत लागते. याच्या बदल्यात पोलिसांची चांगली प्रतिमा दाखवण्याचे दडपण पोलिस सिनेनिर्मात्यांवर का नाही आणू शकत? पांडू हवालदार, सखाराम म्हणून त्यांना हिणवले तर ते कायदा-सुव्यवस्था काय बोडकं सांभाळणार?

चित्रपट परीक्षण मंडळाने लेखी परवानगी दिल्यावरच प्रत्येक चित्रपटाचे प्रदर्शन होते. यावरील सदस्यांची नियुक्ती राजकीय नेतेच करतात. यामध्ये त्यांच्याच मर्जीतील लोक असतात. चित्रपटनिर्मिती हे माध्यम, काही अपवाद वगळल्यास दोन नंबरच्या धंदेवाल्यांच्या हाती आहे तर त्यावरील नियंत्रण हे राज्यकर्त्यांच्या हातात आहे. त्यातून काय निष्पन्न होणार? शर्मिला टागोर या चित्रपट परीक्षण मंडळाच्या अध्यक्षा! धसमुसळ्या शम्मीकपूरबरोबरचे त्यांचेही चित्रपट वादग्रस्त होतेच की!

'चोली के पीछे क्या है' यासारख्या अश्लील गाण्यांच्या चालीवर टी-सिरीजची भजने आजही खपवून घेतली जातच आहेत ना? प्रौढांसाठी असलेले चित्रपट आजही युवा पिढीवरच चालतात. आज मुंबईतील बहुतांश जुन्या थिएटर्समध्ये सकाळच्या वेळेत मल्याळी, भोजपुरी चित्रपट दाखवतात. सेंसॉरचे प्रमाणपत्र दाखवून झाल्यावर, थिएटरमध्येच संकलन (एडिटिंग) करून चक्क बीपी दाखवले जातात. या शोजना सकाळच्या वेळी खूपच गर्दी असते. एरवी नीतिमत्ता जोपासणारे, धर्मसंस्कृतीचे स्वयंभू रक्षक इथे कधी फिरकतही नाहीत. जहाल संघटनाही याची दखल घेत नाहीत. खरे तर त्यांनी ती घेऊही नये. विजय आनंद चित्रपट परीक्षण मंडळाचे सदस्य होते. युरोपमध्ये बार व काही सिनेमागृहे आहेत. तिथे बीपी खुलेआम दाखवले जातात. त्याच धर्तीवर काही थिएटर्समधून थोडे अधिक तिकीट लावून लोकांना अश्लील चित्रपट पाहण्यास परवानगी द्यावी, निदान त्यामुळे सरकारला उत्पन्न तरी मिळेल, असा विजय आनंद यांचा प्रस्ताव होता. केंद्रीय सूचना प्रसारण मंत्री सुषमा स्वराज यांना हा प्रस्ताव बिलकूल आवडला नाही. विजय आनंद यांनी या चित्रपट परीक्षण मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा पाठवून दिला. नाहीतरी इंटरनेटवरून 'सर्व काही' फुकट उपलब्ध आहेच की!

आणीबाणीच्या काळात व्ही.सी. शुक्ला केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्री होते. त्यांनी 'व्हायोलन्स'वर बंदी घातली होती. तीस फुटांपेक्षा लांब फाइट सिक्वेन्स दाखवायचा नाही असा त्यांचा अध्यादेश होता. रागाने, नुसते 'कमीने कुत्ते' म्हणायला तीस फूट फिल्म लागते. पुढचे संवाद कधी म्हणणार? सिनेनिर्मात्यांनी हे निर्बंध दोन वर्षे स्वीकारले होते.


१९७५ साली गुलजारचा 'आंधी' चित्रपट आला. आधीच आणीबाणी चालू होती. त्यातून हा चित्रपट इंदिरा गांधी, नेहरू व फिरोज गांधी यांच्या जीवनावर काढला आहे या समजाने खळबळ माजली, खूप गदारोळ उठला. त्याचे प्रदर्शनही रखडले होते. वास्तविक, बिहारच्या राजकीय नेत्या तारकेश्वरी सिन्हा यांच्या खाजगी जीवनापासून स्फूर्ती घेऊन 'आंधी'ची निर्मिती करण्यात आली होती. गैरसमजामुळे 'आंधी'ची फुकटची प्रसिद्धी झाली. 'सरकार'च्या बाबतीतसुद्धा असाच प्रकार घडला. सिनेमातील कुठल्याही व्यक्तिरेखेचे समाजातील जिवंत अथवा मृत व्यक्तीशी थोडेफार तरी साम्य असणारच!

दीपा मेहताच्या 'वॉटर'ला तर जबरदस्त फटका बसला. रीतसर परवानगी घेऊन बनारसला गंगेच्या घाटावर याचे चित्रिकरण करण्यात येणार होते. या चित्रपटात हिंदू धर्मातील काही अनिष्ट चालीरीती दाखवण्यात येणार आहेत, विधवेच्या भूमिकेसाठी शबाना आजमी व नंदिता दास यांनी खराखुरा 'चमनगोटा' केला आहे, अशी वदंता सर्वत्र पसरली होती. 'बनारस' हे हिंदूंचे पवित्र धर्मक्षेत्र असल्याने लोकक्षोभ उसळून दोन हजार लोकांच्या जमावाने चित्रिकरणाच्या जागेवर हल्ला चढवून संपूर्ण सेटची नासधूस केली. सामानाला आग लावली. तेथील वातावरण चिघळले. प्रचंड आर्थिक नुकसान झाले. शबानावर टीका झाली. शेवटी २००३



'आँधी'मध्ये सुचित्रा सेन आणि संजीवकुमार

'झांसी की रानी'



सालामध्ये नवीन कलाकार घेऊन, चित्रपटाचे नाव बदलून, 'रिव्हर मून' करून त्याचे चित्रण श्रीलंकेत करण्यात आले. या चित्रपटाला विदेशी भाषेतील सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून ऑस्करसाठी नामांकन मिळाले. लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या म्हणून निर्मातीला झोडपून काढायचे की एक सुंदर कलात्मक सिनेमा बनवला म्हणून तिचे कौतुक करायचे? यावर मतभिन्नता असू शकते. 'फायर'मध्ये, लैंगिक कुचंबणा झाल्यामुळे, दोन स्त्रियांत निर्माण झालेले अनैतिक संबंध दाखवले होते. त्यावरही वाद निर्माण झाला होता.

सध्या तर देहप्रदर्शन, उत्तान श्रृंगार, हिंसाचार, खून, बलात्कार या मसाल्याशिवाय चित्रपटच बनत नाही. यासाठी निर्मात्याने कुठल्या थरापर्यंत जायचे? वादग्रस्त सिनेमांवर बंधने, निर्बंध टाकून नीतिमूल्ये खरेच जपली जातात का? सामाजिक ऐक्य दर्शवणाऱ्या चित्रपटांमुळे दोन समाजांतील धार्मिक तेढ कमी होते का? एखादा सिनेमा पाहून तरुण पिढी बिघडते किंवा सुधारते का? धर्मसंस्कृती रक्षणाची, नीतिमूल्ये जपण्याची जबाबदारी नक्की कुणाची? सेंसॉरची, सरकारची की स्वयंघोषित धर्मसंस्कृती रक्षकांची?


याचा सारासार विचार करून, चित्रपटविषयक फेरधोरण आखून त्याची कडक अंमलबजावणी केल्याशिवाय हे वाद कधीच संपुष्टात येणार नाहीत. त्याचबरोबर हेही खरेच आहे, की लोकांना वादग्रस्त चित्रपटच अधिक आवडतात.

**– अरुण पुराणिक**
arun.puranik@gmail.com




**'उंबरठ्यावरचे दिवस' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्या, महावीर माने (आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे), वसंत काळपांडे (माजी शिक्षण संचालक), कुमुद बंसल (माजी शिक्षण सचिव, केंद्र शासन), अनंत दीक्षित (वरिष्ठ संपादक–विकास, लोकमत वृत्त समूह), लेखक भाऊ गावंडे, दिनकर पाटील (शिक्षण सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पुणे), शकुंतला काळे (शिक्षण सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पुणे) आणि राजन फणसाळकर (माजी शिक्षण संचालक)**

**'उंबरठ्यावरचे दिवस'**
**भाऊ गावंडे**




**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

# हवंय तरी काय तुला?

## सुभाष गोडबोले

घटना ९३-९४ सालची आहे. मी तेव्हा पन्नाशीला आलो होतो. वैद्यकीय तपासणीत असे आढळून आले होते, की माझ्या दोन्ही ही किडण्या निकामी होण्याच्या पंथाला लागल्या आहेत आणि हळुहळू पुढील काही वर्षांत त्या पूर्ण निकामी होतील आणि मग मृत्यू अटळ. विविध पथ्ये सांभाळून आणि संयमित आहारविहाराने त्याच्या ऱ्हासाची गती थोडी कमी करता येईल, पण थांबविता येणार नाही. मृत झालेले नेफ्रोन पुनरुज्जीवित करणे तर अशक्यच. मृत्यू असा समोर उभा राहिला की तो अटळ आहे हे आपल्या सर्वांनाच ठाऊक असले तरीही, भल्याभल्यांच्या मनाचा थरकाप उडतोच तसा माझाही उडलाच होता हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही. मी सुन्न झालो होतो. होते नव्हते ते सारे उपाय केले. अश्रद्धांना देखील अशा वेळी देव आणि अध्यात्म आठवू लागते. देवभोळा नसलो तरी उत्तम आध्यात्मिक संस्कार मला माझ्या आईवडिलांकडून व इतर वडीलधाऱ्यांकडून लाभले होते. माझ्या मोठ्या बहिणीची व मेहुण्यांची ह्या मार्गावर बरीच मजल गाठली गेली होती. तिने मला चेंबूरच्या, सत्तरीच्या घरात असलेल्या डॉक्टर फाटकांना भेटायला सांगितले. ते मूत्रपिंडांचे तज्ज्ञ नव्हते, पण एम.बी.बी.एस. होऊन ३०-३५ वर्षे वैद्यकीय व्यवसाय केल्यानंतर त्यांनी होमिओपथीचा दीर्घ अभ्यास केला होता. मुख्य म्हणजे अतिशय निर्मळ, सात्त्विक, परखड बोलणारे, पण यशस्वी डॉक्टर म्हणून त्यांचा लौकिक होता. ते अध्यात्माचे गाढे साधक होते, विचारवंत होते आणि ज्ञानाची कवाडे त्यांना मोकळी नसली तरी किलकिली तर झालेलीच होती. मला हे सर्व कळल्यामुळे मी त्यांच्याकडे जायला फारसा उत्सुक नव्हतो, कारण ते काही तज्ज्ञ नव्हते आणि मुंबईच्या प्रख्यात आणि तज्ज्ञ डॉक्टरांकडून माझे उपचार चालूच होते. तरी मोठ्या बहिणीच्या आग्रहास्तव मी एका सायंकाळी त्यांच्या क्लिनिकमध्ये गेलो. क्लिनिकची वेळ झालेली नव्हती, पण वेळ ठरवून गेल्यामुळे ते माझी वाटच बघत होते. त्यांनी माझी माहिती घेतली, माझ्या बहिणीची व मेहुण्यांची चौकशी केली आणि म्हणाले बोला तुम्हाला काय हवंय माझ्याकडून? मला हा प्रश्न थोडा अनपेक्षित वाटला. मला वाटले ते विचारतील, की तुम्हाला काय होतंय?, काय दुखतं खुपतं वगैरे. खरे तर, त्यांचा प्रश्न मला थोडा अवैद्यकीय वाटला. मी त्यांना माझ्या आजाराबद्दल सांगितले. उत्तरादाखल त्यांनी मला त्यांच्याबद्दलची वर दिलेली माहिती सांगितली आणि म्हणाले, ''तुम्ही मुंबईच्या प्रसिद्ध तज्ज्ञाकडून उपचार करून घेत आहातच. मी तज्ज्ञदेखील नाही. तुम्ही कुलाब्याहून इतक्या दूर चेंबूरला माझ्यासारख्या छोट्या डॉक्टरकडे कशाला आलात?'' मी चक्रावूनच गेलो. मला काय उत्तर द्यावे हेच कळेना.

त्यांच्या तोंडावर राग तर दिसत नव्हताच, पण उपरोधिकपणाही जाणवत नव्हता. उलट एखाद्या ज्ञात्याचा निरलस प्रेमळ भाव होता. शेवटी मी धीर करून त्यांना सांगूनच टाकले, की ''मी फक्त माझ्या बहिणीच्या सांगण्यावरून तुम्हाला भेटावयास आलो.'' त्यांना माझ्या ह्या अप्रिय आणि किंचित उद्धट उत्तराचा राग आलेला दिसला नाही. ते किंचित स्मित करून म्हणाले, ''असे होय, आता आले माझ्या लक्षात. चला आपण एक गेम खेळूया. तुम्ही तुमचीच भूमिका करा आणि मी परमेश्वराची भूमिका वठवतो. लक्षात असू द्या, मला परमेश्वराच्या भूमिकेत काहीही करणे शक्य आहे. मी सर्वशक्तिमान, त्रिकालज्ञानी आणि असंभावाला संभव करणारा आहे. आता विचारा तुमचे प्रश्न आणि तुमच्या शंका.''

मला हे काही फारसे आवडत नव्हते आणि कळतही नव्हते. पण माझा नाइलाज होता. या घटनेला काही वर्षं उलटून गेल्यामुळे नेमके शब्द आता आठवत नाहीत, पण माझ्या शब्दात ती प्रश्नोत्तरे मांडायचा प्रयत्न करतो. कारण तो अनुभव रोमांचित करणारा होता, माझ्या आयुष्याला आणि विचारांना कलाटणी देणारा होता व मनाची शक्ती वाढवणारा होता.

मी – मला सर्वात मोठा प्रश्न आहे तो हा, की मी आयुष्यात असे काय केले की जे मला करायला नको होते किंवा काय केले नाही जे करायला हवे होते. ज्यामुळे मला हा दुर्धर आजार जडला. मी जाणुनबुजून कोणाचे अहित केले नाही, कोणाला दुखावले नाही, कोणाचा अपमान केला नाही, मग असे का व्हावे?

डॉक्टर – प्रत्येकाच्या आयुष्यात सतत काहीतरी घडतच असते, तुमच्याही आयुष्यात हे घडले आहे. विचलित का होता? आणखी काहीही घडले असते तरी तुम्ही हा सनातन प्रश्न विचारलाच असता. तुम्ही काही विशेष केलेलेही नाही, काही चुकवलेलेही नाही आणि तसे बघायला गेलात तर तुमच्या आयुष्यात काही विशेष घडलेलेही नाही. कशाला स्वत:ला इतके महत्त्व देता. ह्या जगात तुमच्यासारखी अब्जावधी माणसे आहेत. पशू, पक्षी आणि कृमी–कीटक यांची तर गणनाच नको. ह्या अब्जावधीमध्ये तुम्ही एक. मग मृत्यूची भीती वाटते का तुम्हाला?

मी – भीती नाही म्हणायला मला खूप आवडले असते, पण ते सत्याला धरून होणार नाही. होय, मला पण इतरांसारखीच मृत्यूची विलक्षण भीती वाटते.

डॉक्टर – बरे, मग. आता तुम्हाला कधीच मृत्यू येणार नाही अशी तजवीज करू का? लक्षात असू द्या, की मी आता परमेश्वराच्या भूमिकेत आहे. हे करणे काही मला अशक्य नाही. तुम्हाला इच्छामरणाचा वर हवा आहे का? पण तुम्ही मात्र होकार द्यायची घाई करू नका. तुम्ही आता पन्नाशीचे आहात. आणखी शंभर वर्षांनी, फक्त शंभरच वर्षांनी काय स्थिती होईल? तुमची पत्नी, मुले, बाळे, भाऊबहिणी, तुमचे सर्व मित्र, सहकारी, समवयस्क नातलग. एवढेच काय तर तुमची नातवंडे, पतवंडेदेखील ह्या जगात नसतील. मग तुम्ही काय करणार? तुम्हाला प्रचंड कंटाळा येईल. पण मग सुटका नाही. कारण तुम्हाला इच्छामरणाचा शाप, हो हो शापच मिळालेला असेल. मला तर नेहमी असे वाटत आले आहे की भीष्माला इच्छामरणाचे वरदान नव्हे, तर इच्छामरणाचा शाप मिळालेला होता.

मी – छे छे, मला अमरत्वही नको आणि इच्छामरण तर नकोच नको. किती भेसूर चित्र रंगवलेय तुम्ही माझ्यापुढे.

डॉक्टर – सत्याइतके भेसूर दुसरे काहीच नसते आणि असे वाटण्याचे मुख्य कारण म्हणजे सत्याला सामोरे जायला आणि त्याचा स्वीकार करायला आपण घाबरतो. बरे, ते जाऊ द्या. आपला गेम आपण पुढे चालू ठेवूया. तुम्हाला मृत्यू स्वीकार्य आहे तर? मग तो मृत्यू कसा यायला हवा ते सांगा. लक्षात असू द्या मी अजूनही सर्वशक्तिमान परमेश्वराच्या भूमिकेतच आहे. तुम्हाला कॅन्सर चालेल का?

मी – नको नको, कारण माझ्या काही वडिलधाऱ्यांचे असे मृत्यू मी पाहिले आहेत. त्यांच्या यातना मला दुरून देखील बघवल्या गेल्या नव्हत्या.

डॉक्टर – बरे मग पक्षाघात चालेल?

मी – तो तर मुळीच नको. अगदी आपल्या प्रियजनांना असे लोळागोळा होऊन खितपत पडलेले पाहताना नको तो विचार मनात येतो, की देवाने ह्यांना या यातनांतून मुक्ती द्यावी.

डॉक्टर – हार्ट फेल्युअर कसे वाटते?

मी – ते तसे फार अचानक नाही होत का? जागा, काळ, वेळ काहीच ठरलेले नसते. पूर्वसूचना नसते. ह्या क्षणी आहोत पुढच्या क्षणी नाही. कितीतरी गोष्टी मनातल्या मनात अर्धवट राहून जातात, नाही का?

डॉक्टर – मग, अपघाती मृत्यू, डिमेन्शिया, पार्किनसन्स?

मी – मी आतून संपूर्णपणे हादरलेलो आहे. कृपा करून मला आणखी प्रश्न विचारू नका आणि असले भयानक ऑप्शन्स देऊ नका.

डॉक्टर – सॉरी. आता आपण हा गेम संपवू या. बघा, तुम्ही स्वत: कितीतरी गोष्टी कबूल केल्या आहेत. तुम्हाला अमरत्व नको, तुम्हाला इच्छामरण तर नकोच नको, मृत्यूची विविध कारणे किंवा ऑप्शन्स पण नको. मग तुम्हाला हवे आहे तरी काय? परमेश्वराने जे दान तुमच्या पदरात टाकले आहे त्याचा तुम्ही आनंदाने स्वीकार का करत नाही? तुम्हाला जे ठरवताना त्रास होतो आहे, जे तुम्हाला ठरवता येत नाही, ते काम परमेश्वराने आपल्या अंगावर घेऊन तुमची सोडवणूक केली आहे, असे नाही वाटत तुम्हाला? त्याचे आभार का मानत नाही? सतत या गोष्टीचा विचार करत राहा. तुमच्याच मनाशी संवाद साधायचा प्रयत्न करत रहा. तुम्ही जे उपचार घेत आहात त्यात मात्र अजिबात कसूर होऊ देऊ नका. तुमचे जीवन हे तुमचे मुळी नसतेच. त्यावर तुमचा अधिकारही नसतो. परमेश्वराने दिलेली ती एक ठेव आहे, देणगी आहे. त्याचा सदुपयोग करत राहा. प्रयत्न करत राहा. फळाची आशा न ठेवता. गीतेत आपण वाचतोच 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'. पण हे नुसते वाचून सोडून द्यायचे नसते, ते अशा प्रसंगी मनात जिरवायचे असते. मी तज्ज्ञ नसतानाही तुम्ही माझ्याकडे का आलात असे मी विचारल्यावर तुम्ही म्हणालात, की बहीण आणि मेहुण्यांच्या सांगण्यावरून तुम्ही येथे आलात. माझ्या तेव्हाच लक्षात आले, की त्यांनी तुम्हाला शारीरिक व्याधीच्या इलाजासाठी माझ्याकडे धाडले नसून, तुम्हाला मानसिक शक्ती प्राप्तीसाठी येथे पाठवले आहे. ती दोघे ह्या मार्गावरचे मोठे साधक आहेत हे मी ओळखून आहे. जा, पळा, कामाला लागा. मलाही कामे आहेतच, रुग्णसेवेची. जेवढे आयुष्य आहे तेवढे अर्थपूर्ण जगा एवढेच मी सांगतो.

मी चमत्कारिक मनस्थितीत त्यांना नमस्कार करून बाहेर पडलो. त्याक्षणी मला खरे तर वाईट वाटत होते. थोडा रागही आला होता. ज्या डॉक्टरी इलाज किंवा किमानपक्षी थोड्या सहानुभूतीची अपेक्षा होती त्याऐवजी कटू उपदेशाचे डोस मिळाले. पण हा अनुभव माझ्या मनात घोळत राहिला. मी जसजसा विचार करत राहिलो तसतसे मला हळूहळू कळत गेले, की त्यांनी मला तेव्हा जे दिले ते खरोखरच अमूल्य होते. प्रचंड मानसिक स्थैर्य मला मिळाले आणि आयुष्याच्या अनेक प्रसंगांमध्ये मला त्याचा उपयोग होत राहिला आणि अजूनही होतो.

**– सुभाष गोडबोले**

इंदूर

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011

RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त आयोजित ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे





बदलापूर
उद्घाटन अरुण साधू
यांच्या हस्ते झाले



सासवड
उद्घाटन वीणाताई वढणे
यांच्या हस्ते झाले




कात्रज
उद्घाटन डॉ. एस.के. क्षीरसागर
यांच्या हस्ते झाले



पनवेल
उद्घाटन प्रशांत ठाकूर
यांच्या हस्ते झाले



अंबरनाथ
उद्घाटन नगराध्यक्ष सुनील चौधरी
यांच्या हस्ते झाले

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.